# जीवन मार्ग

भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)च्या महाराष्ट्र राज्य समितीचे मुखपत्र

वर्ष ५४ । अंक ३३ । १८ ते २४ ऑगस्ट २०१९ । किंमत १० रुपये । पाने १६

## दक्षिण महाराष्ट्रातील भयानक महापुराने लाखोंचे जीवन उध्वस्त!



## पूरग्रस्तांना सढळ हाताने मदत करा!

# सोलापूर : एसएफआय-डीवायएफआयतर्फे भर पावसात झालेल्या संघर्ष मेळाव्यास विद्यार्थी-युवकांचा जोरदार प्रतिसाद




डेमॉक्रॅटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया व स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने ४ ऑगस्ट रोजी सोलापूरच्या कर्णिक नगर क्रीडांगण येथे 'युवा बेरोजगारी एक समस्या' या विषयावर युवा संघर्ष मेळावा आयोजित करण्यात आला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी सीटूचे माजी राज्य अध्यक्ष, माजी आमदार नरसय्या आडम हे होते. जोरदार पाऊस असूनही मोठ्या संख्येने विद्यार्थी-युवक या मेळाव्यास उपस्थित होते.

मेळाव्यास मार्गदर्शन करण्यासाठी सीटूचे राज्य सरचिटणीस अॅड. एम.एच. शेख, किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष सिद्धप्पा कलशेट्टी, नगरसेविका कामिनीताई आडम, माजी नगरसेविका नलीनी कलबुर्गी यांचेसह युसूफ शेख मेजर, प्रा. अब्राहम कुमार, शंकर जाधव, शंकर म्हेत्रे, मुरलीधर सुंचू, माशप्पा विटे, सनी कोंडा, शाम आडम आदी उपस्थित होते.

मेळाव्याची सुरुवात शहीद भगतसिंग यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. प्रजा नाट्य मंडळाचे शाहीर प्रशांत म्याकल व विशाल पवार यांच्या जोशपूर्ण गायनाने मेळाव्यात चैतन्य निर्माण झाले. डीवायएफआयचे जिल्हा सचिव अनिल वासम यांच्या प्रास्ताविकानंतर नरसय्या आडम यांनी मेळाव्यास संबोधित केले. ते म्हणाले, सोलापूर येथे सीटूच्या नेतृत्वाखाली जोरदार लढा व अथक प्रयत्नांतून हजारो बेघर कामगारांनी घरे मिळवली. उर्वरित कामगारांना न्याय मिळवून देण्याचा लढा आजही जोरदारपणे सुरू आहे. यापुढे या लढ्याला बेरोजगारीच्या विरोधातल्या लढ्याची जोड देऊन, बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्याकरता सीटू, डीवायएफआय-एसएफआयच्या बरोबरीने सहभागी होईल.

ते पुढे म्हणाले, आजच्या वाढत्या बेरोजगारीला सरकारची भांडवलशाहीधार्जिणी धोरणे कारणीभूत आहेत. सरकार कंत्राटी पद्धतीने भरती करीत असून सार्वजनिक क्षेत्राचे जोरदारपणे खासगीकरण करीत आहे. निवडणुकांत जिंकून येण्यासाठी भाजपने युवकांना 'मेगा भरती' सारखी अनेक गाजरे दाखवली. मात्र निवडून आल्यानंतर सोयिस्करपणे त्याचा त्यांना विसर पडला आहे. त्यांना झोपेतून जागे करण्याचे काम विद्यार्थी-युवकांना करावे लागेल. त्यासाठी जोरदार लढ्याची तयारी करावी लागेल. या लढाईत सीटू तुमच्याबरोबर सहभागी होईल असे त्यांनी उपस्थितांना आश्वासन दिले.

अॅड.एम.एच.शेख, डीवायएफआयचे जिल्हा अध्यक्ष विक्रम कलबुर्गी, व उपाध्यक्ष अशोक बल्ला, एसएफआयचे जिल्हा सचिव मल्लेशम कारमपुरी यांनीही मेळाव्यास संबोधित केले. ३० ऑगस्ट रोजी एसएफआय-डीवायएफआयतर्फे आयोजित करण्यात आलेल्या बेरोजगारी विरोधातल्या राज्यव्यापी आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हा! या आशयाचा ठराव डीवायएफआयचे राज्य कमिटी सदस्य दत्ता चव्हाण यांनी मांडला. कादर शेख यांनी त्यास अनुमोदन दिले. राहुल जाधव यांनी श्रद्धांजलीचा ठराव मांडला. सूत्रसंचालन विजय हरसुरे यांनी तर आभार बाळासाहेब मल्याळ यांनी मानले.

मेळावा यशस्वी करण्यासाठी एसएफआय-डीवायएफआयच्या जिल्हा कमिटी सदस्यांनी परिश्रम घेतले.

**- अनिल वासम/ मल्लेशम कारमपुरी**

# तिवसा : मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातर्फे न.पं.वर मोर्चा

अमरावती जिल्ह्यातील तिवसा नगरपंचायतीत विविध मागण्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. या मागण्यांबरोबरच ओबीसी घरकुलाचा मुद्दा व अन्य मुद्दे लवकर निकाली काढावेत व प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेचे धनादेश लाभार्थ्यांना देण्यात यावे आदी मागण्या घेऊन भर पावसात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातर्फे ९ ऑगस्ट रोजी मोर्चा काढण्यात आला.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यालयापासून मोर्चाची सुरुवात करण्यात आली. यावेळी मोठ्या प्रमाणात महिला व पुरुष वर्ग सहभागी झाले होते. नगरपंचायत येथे मोर्चाने धडक दिल्यानंतर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हा सचिव महादेव गारपवार, दिलीप शापामोहन, सुरेश मोरघडे, नगरसेविका सविता सुरजुसे, प्रभाकर डहाके, बेबी सुरजुसे, प्रफुल्ल निकाळजे, विजय नेमाडे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.




**- महादेव गारपवार**

# जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

संपादक
डॉ. उदय नारकर

कार्यकारी संपादक
विजय पाटील

संपादक मंडळ
डॉ. अशोक ढवळे
अजित अभ्यंकर
डॉ. विठ्ठल मोरे
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
हिरा जनार्दन
प्राची हातिवलेकर
डॉ. माया पंडित

मुद्रक/प्रकाशक
डॉ. अशोक ढवळे

अक्षरजुळणी
गणपत गुरव

मुखपृष्ठ व मांडणी
सुहास मोरे

व्यवस्थापक
चंद्रकांत शिंदे

प्रसिद्धी स्थळ
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
ई मेल : mahacpim@gmail.com


## चला, पूरग्रस्तांचे जीवन पुन्हा उभे करू या!

संपादकीय

आपल्या मानसिकतेत 'ये रे ये रे पावसा'ची जागा 'ये रे ये रे पैसा'ने घेतली आणि आपण निसर्गाचे चक्रच उलटेपालटे करून टाकले. तापमान बदलामुळे पाऊसमानात काय बदल झाले, याचे गणित जगभर मांडले जात आहे. त्याचे काय उत्तर यायचे ते येवो; पण आपल्याला आता महाराष्ट्राच्या सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यात आलेल्या महापुराचा जमाखर्च तातडीने आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडावा लागेल. त्याच्या सोडवणुकीतून भविष्यात पुन्हा अशा घोर प्रसंगाला सामोरे जावे लागू नये, याची काही तरतूद करता येईल.

ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या पावसाने आलेल्या महापुरामुळे या तिन्ही जिल्ह्यांच्या मोठ्या भागाची अतोनात हानी झाली. लक्षावधी लोकांचे संसार उद्ध्वस्त झाले आणि उभी पिके पाण्यात कुजून गेली. प्राथमिक अंदाजानुसार जनतेचे एकूण १५ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले असून नेमका अभ्यास झाल्यावर त्याचा आकडा आणखी फुगणार आहे. यात सर्व व्यावसायिकांचे नुकसान झालेले असले तरी खरी वाताहत झाली आहे शेतीवर उदरनिर्वाह असणाऱ्यांची. सातारा जिल्ह्यातील सुमारे ३ लाख हेक्टर शेतीपैकी ३९ हजार हेक्टर शेतजमीन महापुराने बुडवली आहे. अशा बाधित शेतकऱ्यांची संख्या आहे १ लाख ४० हजार. सांगली जिल्ह्यातील सव्वादोन लाख हेक्टर शेतीपैकी ५० हजार हेक्टर शेती उद्ध्वस्त झाली असून १ लाख १५ हजार शेतकऱ्यांचे जीवन महापुरात वाहून गेले आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील सुमारे ४ लाख हेक्टरपैकी १ लाख १० हजार हेक्टर शेती पाण्याने धुवून नेली असून ३ लाख वीस हजार शेतकरी बरबाद झाले आहेत. अशा रीतीने या तीन जिल्ह्यातील एकूण शेतीपैकी जवळजवळ २५ टक्के शेती नष्ट केली आहे. पण नष्ट झालेल्या शेतीच्या आकड्यांपेक्षा झालेले नुकसान कितीतरी पट जास्त झाले अहे, याचे कारण ही सर्व शेतजमीन नदीकाठची, शंभर टक्के सिंचनाखाली असून त्यात नगदी पिके घेतली जात होती. या तीन जिल्ह्यांतील ५ लाख एकरातील पिके कुजली असून केवळ उसाचेच नुकसान दीड हजार कोटींहून जास्त झाले आहे. सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील ७५ टक्के शेती आणि कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील ८० टक्क्यांहून जास्त शेती कृष्णार्पण झाली असून नदीच्या पाण्यापासून वाचलेली शेती सततच्या पावसाने नष्ट केली आहे. अशा रीतीने शेतीचे शंभर टक्के नुकसान झाले असूनही सरकार टक्केवारीनुसार नुकसान भरपाई देण्याची भाषा करत आहे. आकडेवारीचा खेळ करून शेतकऱ्यांच्या, शेतमजुरांच्या आणि एकूणच जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्याचा निर्लज्जपणा दाखवत आहे.

या नुकसानीस काही प्रमाणात अस्मानी कारणीभूत असली तरी मनुष्य आणि पाळीव जनावरांच्या प्राणहानीला देवेंद्र फडणविसांचा ढिसाळ कारभार जबाबदार आहे. महाराष्ट्राचा कायापालट करायचे वचन देऊन सत्ता बळकावलेल्यांनी गांभीर्याने महापुरासारखा प्रश्न हाताळायला पाहिजे होता. पाण्यात बुडणाऱ्या लोकांचे जीव आणि संसार मोठ्या प्रमाणावर वाचवले ते उत्स्फूर्तपणे मदतकार्यात उतरलेल्या जनतेने. गावामागून सरकारची वरात निघाली आणि त्यातही मंत्र्यासंत्र्यांनी पूर पर्यटनाची हौस भागवून घेतली. असा प्रेक्षणीय महापूर थोडाच वारंवार येत असतो? महाराष्ट्राच्या तोंडावर कर्नाटकचे अलमट्टी महाधरण आहे. त्याच्या उंचीला महाराष्ट्राचा आक्षेप आहे, कारण त्याचा फुगवटा महाराष्ट्राच्या काही भूभागाला गिळून टाकतो. वास्तवात काय झाले आहे, याचा तपास न करताच महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी कर्नाटकच्या पुन्हा परिणत झालेल्या मुख्यमंत्र्यांना प्रशस्तीपत्र बहाल करून टाकले आहे.

दक्षिण महाराष्ट्रातील महापुराचे नियोजन हा राज्याच्या प्रशासनासमोरील एक खास प्रश्न आहे. या तीन जिल्ह्यांत पंचवीसहून जास्त नद्या वहात असून मोठमोठ्या धरणांत २१० टीएमसी पाणी साठवले जाते. इतक्या मोठ्या प्रमाणावर साठवलेल्या पाण्याचे नियोजन हितसंबधांच्या कसल्याही दबावाला बळी न पडता शास्त्रीय पायावर केले पाहिजे. याबाबतीत आनंदीआनंदच आहे. मोठा पाऊस पडण्याचे अंदाज दिले जाऊनही या धरणातील साठलेल्या पाण्याचा आगाऊ विसर्ग करण्यात आला नाही, असे बोलले जाते. जुलैच्या शेवटच्या आठवड्यातच ही धरणे जवळजवळ संपूर्ण भरलेली होती. अशा वेळी त्यातील पाण्याच्या विसर्गाचे नियोजन करणे आवश्यक होते. ते झाले नाही. आभाळातून पडणारा पाऊस अडवता येत नाही, पण अडवलेले पाणी सोडता येते. ते वेळेवर का सोडण्यात आले नाही, याची चौकशी झाली पाहिजे. कृष्णाकाठचे ब्रह्मनाळ गाव नेहमी साध्या पुरातही बुडते हे ठाऊक असूनही त्याचे पुनर्वसन तर सोडाच पण तेथील पूरग्रस्तांना वाचवण्यासाठी पुरेशी मदतही न केल्याने १६ जणांना हकनाक जीव गमावावा लागला. हे भाजप-सेना सरकारने घेतलेले बळीच होत. त्यात

पूरग्रस्तांना तुटपुंजी मदत जाहीर करून त्यांच्या केलेल्या थट्टेचीही महाजनादेश यात्रा काढून जाहिरातबाजी सरकार करू लागले आहे. या भागातील शेतकरी दुधाचा व्यवसाय जोडव्यवसाय म्हणून मोठ्या प्रमाणात करतो. कित्येक कुटुंबांचा तोच प्रमुख व्यवसाय आहे. त्याची तर नीट मोजदादच केलेली दिसत नाही.

खरे तर या महापुराच्या परिणामी राज्य मंत्रिमंडळाने पहिली घोषणा करायला हवी होती या तिन्ही जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या सर्व प्रकारच्या कर्जमाफीची. पीककर्ज असो की जनावरांसाठी घेतलेले कर्ज असो, त्यातून आता तरी या शेतकऱ्याला मुक्त करायची दानत सरकारने दाखवायला हवी. त्याऐवजी सरकार शेतकरी सन्मान योजनेतील शेतकऱ्यांच्या याद्या पाहून मदत देण्याचे नाटक करू पहात आहे.

महापुराने शेती आणि इतर व्यवसाय नष्ट झाले आहेतच, शिवाय राहती घरेही बुडाली आहेत. गावेच्या गावे दहाहून अधिक दिवस पाण्याखाली असल्याने रोगराई पसरणार आहे. शेतकऱ्यांचे पशुधन बुडाल्याने रोगराई आणखी तीव्र होणार आहे. याबाबतीत जनतेला साह्य करण्यासाठी अनेक स्वयंसेवी संस्था संघटना पुढाकार घेत आहेत. पूरग्रस्तांना तातडीने औषधे पुरवण्याची स्पृहणीय कामगिरी सीटूच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र राज्य औषध विक्रेते संघटनेच्या कार्यकर्त्यांनी केल्याची नोंद घेतलीच पाहिजे.

या महापुराची तीव्रता वाढायला बिल्डर लॉबीने कायदा धाब्यावर बसवून केलेले कारनामे मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहेत. या लॉबीचे खंदे पुरस्कर्ते असलेले मंत्रीच आता सत्ताधारी पक्षाचे राज्य अध्यक्ष झाल्याने या लॉबीने सुटकेचा निश्वास सोडला असणे शक्य आहे. पण जनतेच्या भल्यासाठी वाळू उपसा करणारे माफिया, पूररेषेच्या आत मोठमोठी बांधकामे करणारे विकासक आणि कंत्राटदार, अशा बेकायदेशीर बांधकामांना पाठीशी घालणारे नगरपालिका-महानगरपालिकांतील सत्ताधारी आणि नोकरशाही यांच्या कारनाम्यांची या निमित्ताने शहानिशा झाली पाहिजे. प्रशासनातही काही कार्यक्षम अधिकारी असतात याचा अनुभव कोल्हापूरने नुकताच घेतला आहे. नव्यानेच रुजू झालेले कोल्हापूरचे महापालिकेचे आयुक्त श्री. कलशेट्टी यांनी पावसाळ्याआधी शहरातील नालेसफाईची कामे मोठ्या प्रमाणात करून घेतली नसती तर या महापुराने नागरी वस्तीत आणखी थैमान घातले असते.

या महापुराचा अनुभव ध्यानात घेऊन पुन्हा अशी आपत्ती येऊ नये, याची काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी शास्त्रशुद्ध पायावर नियोजनाचे पुनर्मूल्यांकन करून सुधारणेचा मास्टर प्लॅन बनवला पाहिजे. या आधी १९५३, १९८३ आणि एकविसाव्या शतकात २००५ साली असेच महापूर येऊन गेले आहेत. यावेळच्या महापुराने त्या सर्व महापुरांवर कडी केली आहे. किती गावे थोड्या पावसानेही पाण्यात जातात, धरणक्षेत्रात किती पाऊस पडतो, याचे गणित मांडणे अवघड नाही. पण ती इच्छाशक्ती राज्यकर्त्यांनी आणि प्रशासनाने दाखवली पाहिजे. कृष्णा खोऱ्यात पुराच्या, अतिवृष्टीच्या काळात नियोजन करता यावे यासाठी दर पंधरा मिनिटांनी पावसाची नोंद घेणारी यंत्रणा पुण्यात बसवलेली आहे. ती यंत्रणा गंजत पडल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. अस्मानीला तोंड देता यावे यासाठी राज्यकर्ते नेमलेले असतात. त्यांचीच सुलतानी जनतेच्या घरादारांवर, शेतीवाडीवर रणगाडे फिरवू लागली तर जनतेला आपल्या जीवनाची सूत्रे स्वत:च्याच हाती घ्यावी लागतील. महापुरावर मात करण्यात आपल्याला अपयश आल्याचे महाराष्ट्राचे कुशासन चांगलेच जाणून आहे. याच कारणासाठी जनतेच्या असंतोषाचा उद्रेक होणार आहे, याला धास्तावून भाजप-सेना सरकारने या पूरग्रस्त जिल्ह्यांत बंदी हुकूम जाहीर केला. काश्मीरपासून कोल्हापूरपर्यंत जनतेला धास्तावलेले सरकार तिच्याभोवती तुरुंग बांधत आहे. त्याच्या भिंती जनता उद्ध्वस्त करायला सिद्ध होत आहे, हे पाहून पूरग्रस्त जिल्ह्यांतील बंदी हुकूम मागे घेण्याची नामुष्की या सरकारवर आली.

आता समस्या आहे पूरग्रस्तांच्या पुनर्वसनाची. त्यांच्या भौतिक आणि मानसिक पुनर्वसनाची. त्यासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने पुढाकार घेतला आहे. पूरग्रस्तांचे जीवन पुन्हा उभे करण्यासाठी महाराष्ट्रातील जनतेने पुढाकार घ्यावा, पक्षाच्या प्रयत्नांना साथ द्यावी, असे आवाहन आम्ही करत आहोत.

★ ★ ★

---

(पॉलिटब्यूरोचे निवेदन... पान ६ वरून)

## भाजपचा ‘बेटी बचाओ’ बाबत दांभिकपणा

अल्पवयीन मुलीवरील बलात्काराचे उन्नाव प्रकरण आणि त्यातील मुख्य आरोपी असलेल्या भाजप आमदाराने त्या अनुषंगाने तक्रारदाराला व तिच्या कुटुंबीयांना संपविण्यासाठी केलेली गुन्हेगारी कृत्ये यामुळे सारा देश स्तंभित झाला आणि भाजपच्या ‘बेटी बचाओ’मधील दांभिकपणा उघड झाला. देशभरात झालेल्या उद्रेकानंतर भाजपने गुन्हेगार आमदाराला पक्षातून काढून टाकले आहे. उत्तर प्रदेश सरकार बलात्काराचा आरोप असलेल्या गुन्हेगाराला संरक्षण देत न्यायाच्या प्रक्रियेलाच उलथवून टाकायला निघाले होते. पण चारही संबंधित खटले उत्तर प्रदेशातून हलविण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे उत्तर प्रदेश सरकारला चांगलीच फटकार मिळाली. न्याय मिळविण्याच्या संघर्षात बलात्कारपीडितेला कोणत्या पातळीचा संघर्ष करावा लागतो त्याचे हा खटला म्हणजे एक उदाहरण आहे. स्त्रियांवरील लैंगिक अत्याचारात आणि विशेषत: लहान मुलांवरील अत्याचारात प्रचंड वाढ होत असताना त्या गुन्ह्यांना प्रतिबंधित करण्यासाठी व जलदगतीने न्याय मिळवून देण्यासाठी वर्मा कमिटीने केलेल्या शिफारसींची अंमलबजावणी करण्याची मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष करीत आहे.

## गंभीर पूर परिस्थिती

देशातील विविध भागांत पुरांमुळे जो विध्वंस झाला आहे त्याबद्दल मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष गंभीर चिंता व्यक्त करीत आहे. अनेक नद्यांच्या पुरामुळे प्रचंड नुकसान आणि जीवितहानी झालेली आहे. आसाम, बिहार, उत्तर प्रदेश आणि इतर अनेक राज्यांत पुरामुळे मोठा विध्वंस झालेला आहे. राज्य सरकारांना आवश्यक ती मदत युद्ध पातळीवरून देत आणखीन होणारे नुकसान टाळावे असे आवाहन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष करीत आहे.

## भारताच्या कम्युनिस्ट पक्षाच्या स्थापनेची शताब्दी

भारताच्या कम्युनिस्ट पक्षाची स्थापना १७ ऑक्टोबर १९२० ला ताश्कंद येथे झाली. १७ ऑक्टोबर, २०१९ ते १७ ऑक्टोबर २०२० या कालावधीत संपूर्ण पक्षाने शताब्दीचे कार्यक्रम करावेत असे आवाहन पॉलिटब्यूरो करीत आहे. आपल्या देशातील कम्युनिस्ट चळवळीचा भव्य इतिहास, भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग, स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचे जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी केलेले संघर्ष, कामगार वर्गाच्या आणि शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी दिलेले लढे यावर या कार्यक्रमातून प्रकाशझोत टाकला जाईल.

**(अनुवाद : राजीव देशपांडे)**

# मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिटब्यूरोचे निवेदन

*३१ जुलै २०१९ रोजी नवी दिल्ली येथे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या पॉलिटब्यूरोची सभा झाली. त्यानंतर खालील निवेदन प्रसृत करण्यात आले.*

## विदारक आर्थिक मंदी

सर्वांगीण आर्थिक मंदी आणि खोलवर पसरत चाललेल्या शेतीवरील अरिष्टाबरोबर सातत्याने वाढणारी बेरोजगारी आपल्या बहुसंख्य जनतेचे जीवनमान उद्ध्वस्त करीत आहे.

जून २०१८च्या ७.८ टक्के वाढीशी तुलना करता भारतीय उद्योगातील कळीच्या क्षेत्रातील जून २०१९ मधील वाढ ०.२ टक्क्याने घटून ४४ महिन्यापूर्वीच्या पातळीला पोहोचली आहे.

देशातील वाहन उद्योग जवळ जवळ चार कोटी लोकांना रोजगार देतो. देशाच्या जीडीपीत या उद्योगाचा वाटा ७.५ टक्के आहे आणि उत्पादनाच्या जीडीपीत ४९ टक्के आहे. असा हा उद्योग आज संकटात सापडला आहे. १७ पैकी १० मोटार कंपन्यांनी विक्रीत उणे वाढ दाखवली आहे. त्यामुळे या क्षेत्रातील उत्पादनात कपात होत असून कामगारांना ले-ऑफ तसेच मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या जाणे यासारख्या परिणामांना सामोरे जावे लागणार आहे. वाहन उद्योगाच्या अनुषंगिक उद्योगातील जवळजवळ १० लाखांच्यावर लोकांना ले-ऑफ दिल्याची वृत्ते या आधीच प्रसिद्ध झाली आहेत.

## खासगीकरणाचे वाढते प्रमाण

पुन्हा निवडून आल्यावर मोदी सरकारने खासगीकरणाच्या घोषणांचा धडाका लावलेला आहे. संरक्षण उत्पादनाच्या ४२ युनिट्सचे खासगीकरण व्हावयाचे आहे. सध्या ४२ लष्करी सामग्री बनविणारे कारखाने, डीआरडीओची युनिट्स आणि सर्व लष्करी अभियांत्रिकी सेवा ज्या चार लाख नोकऱ्या देतात. खासगीकरणानंतर त्यांचे भविष्य अधांतरी बनणार आहे. सहा विमानतळाच्या खासगीकरणाचे कंत्राट या आधीच अदानीला दिलेले आहे. आता सरकारने आणखीन २०-२५ विमानतळाच्या खासगीकरणाची घोषणा केलेली आहे. टप्प्याटप्प्याने भारतीय रेल्वेचे खासगीकरण चालूच आहे. पुढील तीन वर्षात केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगात आपला वाटा ४९ टक्क्यांपर्यंत खाली आणण्याची योजना या सरकारने बनविली आहे.

## आकडेवारीतील अफरातफर

अर्थव्यवस्था घसरणीला लागली असताना सरकार सत्य दडविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आकडेवारीत अफरातफर करीत आहे. आता हे दिसून येत आहे की अर्थसंकल्पातील आकडेमोड आकडेवारीतील अफरातफरीवर आधारीत होती. अर्थसंकल्पीय खात्यात कमीतकमी १.७ लाख कोटी रक्कम वगळण्यात आलेली आहे हे अगदी स्पष्टपणे दिसत आहे. घोषित लक्ष्यापेक्षा जीएसटीची जमा झालेली रक्कम खूपच कमी आहे तरीही महसुलाचे आकडे मात्र खूपच फुगलेले आहेत. कॅगनुसार सरकारची वित्तीय तूट जूनच्या तिमाहीत ३.४२ लाख कोटीला पोहोचली आहे. ही तूट २०१९-२०च्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ६१.४ टक्के आहे. या वित्तीय वर्षाच्या तीन तिमाही अजून शिल्लक आहेत. त्यामुळे ज्या वित्तीय शिस्तीबद्दल सरकार फुशारक्या मारत असते ती वित्तीय शिस्त पाळणे सरकारला अशक्य आहे हे स्पष्ट आहे.

गेल्या अर्ध्या शतकातील बेरोजगारीचा आकडा आज सर्वात जास्त असल्याचा पुरावा असताना रोजगाराची आकडेवारी गोळाही करण्यात आलेली नाही. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची आकडेवारीही गोळा केलेली नाही. त्यामुळे शेतीवरील अरिष्टाची तीव्रता विनाखबर आणि म्हणून दुर्लक्षित राहील!

## साट्यालोट्याची भांडवलशाही

जरी एनपीएच्या प्रमाणात घट झाली असल्याचा सरकारचा दावा असला तरी राष्ट्रीयकृत बँकांकडून घेतलेले कर्ज बुडवत देशाच्या संपत्तीची लूट करणे चालूच आहे. खरेतर, बँकेच्या स्वत:च्या वह्या या वर्षात प्रत्यक्ष एनपीएच्या रकमेत २,३०,८११ कोटीने वाढल्याचे दाखवत आहेत आणि ही रक्कम २०१८-१९ मध्ये १.९६ लाख कोटी रुपयांची कर्जाची रक्कम 'राईट ऑफ' केल्यानंतरची आहे.

## संसदीय संस्थांवरील हल्ले

सर्व स्वायत्त घटनात्मक अधिकार क्षेत्राचे वेगाने अवमूल्यन होत आहे.

## संसदीय कार्यपद्धती

भाजप सरकार निवडणुकीनंतरच्या संसदेच्या पहिल्याच अधिवेशनात महत्त्वाची विधेयके मंजूर करून घेत आहे. संसदेने स्थायी समिती आणि सभागृहाच्या समित्या स्थापन केल्यानंतर वैधानिक कामकाज लोकसभेकडे प्रस्तावित केले जाते. ते सर्व सबंधित समित्यांकडे पडताळणीसाठी पाठविले जाते. ही पद्धत या सरकारने बाजूस सारली. अजून कोणतीही समिती स्थापित करण्यात आलेली नाही. कायद्याच्या परिणामांचा कोणताही गंभीर विचार न करता कमीतकमी १७ महत्त्वाची विधेयके मंजूर करण्याच्या उद्देशाने संसदेच्या अधिवेशनाचा कालावधी वाढविण्यात आला आहे.

विधेयकांची छाननी करण्यासाठी किमान निवड समिती तरी स्थापन करा ही विरोधकांची मागणीही सरकारने धुडकावून लावली. ही सर्व विधेयके भाजपने संसदेतील आपल्या पाशवी बहुमताच्या जोरावर मंजूर करून घेतली.

## संघराज्य पद्धतीचे अवमूल्यन

दहशतवाद विरोधी (यूएपीए) कायद्यात दुरुस्ती मंजूर करण्यात आली. त्या दुरुस्तीनुसार गृह मंत्रालयाला आता कोणत्याही राज्यातील कोणत्याही व्यक्तीला दहशतवादी म्हणून जाहीर करण्याचा कायदेशीर अधिकार प्राप्त झाला आहे. त्यासाठी आता गृह मंत्रालयाला संबंधित राज्य सरकारला माहिती देण्याची गरज लागणार नाही. अशा व्यक्तींच्या मालमत्ता जप्त करण्याचा अधिकारही देण्यात आला आहे. असंतोष व्यक्त करणारी व्यक्तीही आता मनमानीपणे दहशतवादी म्हणून जाहीर करता येईल. ज्या व्यक्तीवर आरोप असेल त्याला/तिला आपले निरपराधीत्व सिद्ध करावे लागेल. जो पर्यंत तुम्ही गुन्हेगार आहात हे सिद्ध होत नाही तोपर्यंत तुम्ही निरपराध असता या तत्त्वाऐवजी आता तुम्ही निरपराध आहात हे जोपर्यंत तुम्ही सिद्ध करत नाहीत तोपर्यंत तुम्हाला गुन्हेगार मानण्यात येईल हे तत्त्व अमलात येईल. याच्यामुळे प्रचंड दडपणूक, छळवणूक आणि अन्याय होईल. कायदा आणि सुव्यवस्था हा विषय राज्य सरकारांच्या अखत्यारीतील विषय असूनही संघराज्याच्या तत्त्वाला न जुमानता त्या राज्य सरकारांना बाजूस सारले जाईल.

प्रत्यक्षात माहितीचा अधिकार जवळजवळ रद्द करत माहितीच्या अधिकाराच्या कायद्यात दुरुस्ती करण्यात आली. सरकारकडे लपविण्यासारखे बरेच असते. आपले अंतर्गत कामकाज आणि आपण आपल्या सग्यासोयऱ्यांना देत असलेले फायदे सार्वजनिकरित्या उघड होऊ नये असेच त्यांना वाटत असते. घटनेने दिलेल्या मुलभूत अधिकारांचे हे सरळ सरळ उल्लंघन आहे.

विवाहाचा नागरी करार तोडण्याला फौजदारी गुन्हा मानणारे तिहेरी तलाक

विधेयक संमत करण्यात आले. याचा मुस्लीम अल्पसंख्याकांविरोधात मोठ्या प्रमाणावर गैरवापर होण्याची शक्यता आहे.

याच प्रमाणे सर्वोच्च न्यायालय आणि न्यायव्यवस्था, निवडणूक आयोग, रिझर्व्ह बँक, कॅग या सर्व संस्था कमीअधिक प्रमाणात दबावाखालीच काम करीत आहेत. ही सर्व देशातील घटनात्मक व्यवस्थेचे अवमूल्यन होत असल्याचीच लक्षणे आहेत.

## धर्मांध केंद्रीकरण

तीव्र होत असलेल्या धर्मांध केंद्रीकरणामुळे देशभरात द्वेष, असहिष्णुता आणि हिंसाचाराचे वातावरण निर्माण झालेले आहे. जवळजवळ सर्वच भाजपशासित राज्यांत मुस्लिमांवर एक तर 'बीफ' खाल्ल्याच्या आरोपावरून किंवा त्यांनी 'जय श्रीराम'च्या घोषणा देण्याची सक्ती करण्यावरून हल्ले होत आहेत. जास्तीत जास्त हल्ले उत्तर प्रदेशात होत आहेत. तसेच झारखंड, महाराष्ट्र, आसाम, बिहार, पश्चिम बंगाल आणि देशातील इतर राज्यांतूनही हल्ले होत असल्याच्या बातम्या येत आहेत.

## हुकूमशाही हल्ले

या सरकारच्या दोन महिन्यांच्या कालावधीत जनतेच्या लोकशाही हक्कांवर आणि नागरी स्वातंत्र्यावर अभूतपूर्व हल्ले होताना दिसत आहेत. उत्तर प्रदेशात मुख्यमंत्र्याच्या विरोधात 'आक्षेपार्ह मजकूर' शेअर केल्याच्या आरोपाखाली अनेकांना अटक करण्यात आली आहे. अशाच आरोपांखाली अनेक लोकांना आसाम, उत्तराखंड, गोवा वगैरे भाजपशासित राज्यांत अटक करण्यात आलेली आहे. यामुळे सोशल मीडियावर एक प्रकारे भीतीची भावना पसरवली जात आहे व लेखकांना, व्यक्तींना सर्वोच्च न्यायालयाने माहिती कायद्याच्या '६६ अ' या अन्यायी कलमाच्या विरोधात निकाल देऊनही लक्ष्य केले जात आहे.

द्वेष आणि असहिष्णुतेचे वातावरण पसरवून सामाजिक कार्यकर्ते आणि मानवाधिकार कार्यकर्ते यांना 'अर्बन नक्षलवादी' किंवा 'टुकडे टुकडे गँग' वगैरे नावाखाली लक्ष्य केले जात आहे. सरकार, रास्वसंघ, भाजप आणि त्यांचे नेते या सगळ्याच्या विरोधातील असंतोषाचा आवाज बंद करणे हाच एकमेव उद्देश याच्यामागे आहे.

## कामगार कायद्यात कामगारविरोधी दुरुस्त्या

सध्या अस्तित्वात असलेल्या १७ कामगार कायद्यांच्या जागी ४ कामगार संहिता आणणार असल्याचे या सरकारने घोषित केलेले आहे. आधीच कामगार वर्गाच्या लोकशाही हक्कांवर वाढते हल्ले होत आहेत. हे प्रस्तावित संहितीकरण म्हणजे कामगार वर्गाने गेल्या काही दशकांत संघर्षाच्या माध्यमातून जे काही हक्क कमावले आहेत ते संपविणे होय. कठोर संघर्षातून कमावलेल्या या हक्कांना धक्का लागू दिला जाणार नाही, ते हक्क कमकुवत करू दिले जाणार नाही.

२ ऑगस्टला केंद्रीय कामगार संघटना आणि महासंघ यांच्या संयुक्त मंचातर्फे होणाऱ्या देशव्यापी निदर्शनांना मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आपला संपूर्ण पाठिंबा देत आहे.

## काश्मीर

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा पॉलिटब्यूरो जम्मू आणि काश्मीरमध्ये विधानसभेच्या निवडणुका त्वरित घेण्याची मागणी करीत आहे. लोकसभेबरोबरच जम्मू आणि काश्मीरमधील बरखास्त विधानसभेच्या निवडणुका घेण्याची मागणी राज्यातील सर्व राजकीय पक्षांनी केली होती. पण कोणताही स्पष्ट खुलासा करण्यात आला नाही. जर लोकसभेच्या निवडणुका घेण्यास सुरक्षेबाबत कोणतीही कारणे नव्हती तर विधानसभेच्या निवडणुका एकत्र का घेतल्या गेल्या नाहीत ?

जम्मू आणि काश्मीरच्या स्वायत्ततेसंदर्भातील घटनेतील कलम ३५ रद्द करण्याचा केंद्राचा उद्देश असल्याच्या घोषणा गृहमंत्र्यासह भाजपच्या विविध नेत्यांनी केल्या आहेत. त्यामुळे जम्मू काश्मीरची जनता आणि उर्वरित भारत यातील एकात्मतेचे बंध अधिकच कमकुवत होत जातील. सध्या ही बाब सर्वोच्च न्यायालयाच्या विचाराधीन आहे. न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होऊ देणे गरजेचे आहे. सर्व संबंधितांबरोबर राजकीय संवाद साधण्याचे आश्वासन भाजप सरकारने पूर्वीच दिले होते. पण आज असा संवाद साधण्यास ते नकार देत आहेत. असा संवाद खोऱ्यात सुरळीतता येण्यास आणि शांतता नांदण्यास आवश्यक आहे. दहशतवादी हल्ल्यांच्या वाढत्या धोक्याला तोंड देण्यासाठी अतिरिक्त जवान तैनात करण्यात आल्याचे सरकारतर्फे अधिकृतपणे सांगितले गेले आहे. त्याचबरोबर जोपर्यंत संवादाची प्रक्रिया सुरू होत नाही तोपर्यंत जम्मू आणि काश्मीरमधील परिस्थिती सुरळीत होणे शक्य नाही.

## राज्य सरकारांची पाडापाडी

कर्नाटकातील काँग्रेस-जेडी(एस) सरकार भाजपने खुलेआम घोडेबाजार भरवून ज्या पद्धतीने पाडले त्यावरून भाजपचा हेतू विरोधकमुक्त भारत निर्माण करण्याचा आहे. कर्नाटकातील आघाडी सरकारमध्ये काहीही प्रश्न असोत, हे स्पष्ट आहे की, भाजपने या सरकारला विधानसभा निवडणुकीनंतर सत्तेवर येण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला होता आणि त्यानंतरही सातत्याने सरकार अस्थिर करण्याचे भाजपचे प्रयत्न चालूच होते. आता त्यांनी विरोधकांची सत्ता असलेल्या इतर राज्यांकडे लक्ष वळविले आहे.

## आसाममधील नागरिक नोंदणी प्रक्रिया

आसाममधील नागरिकांच्या नोंदणीची अंतिम यादी ३१ ऑगस्टला प्रसिद्ध होईल. आत्तापर्यंत ४०.७ लाख आणि अतिरिक्त १.०२ लाख अर्जदारांना नागरिकांच्या राष्ट्रीय नोंदवहीतून वगळण्यात आले आहेत. अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यावरही या सर्व लोकांना अपील करण्याची संधी मिळेल व ते ऐकले जाईल याची खात्री देणे आवश्यक आहे. परकीयांसाठी असलेले न्यायासन हा त्यासाठी योग्य मंच नाही कारण तो मंच काही न्यायालयीन संस्था नाही. जे नागरिक राहणार नाहीत त्यांचे हक्क व त्यांचा दर्जा काय असणार याची स्पष्टता सरकारने केली पाहिजे.

परकीय म्हणून घोषित करून ज्यांना बंधक छावण्यांतून स्थानबद्ध करून ठेवण्यात आले आहे त्यांच्या संदर्भात पॉलिटब्यूरोने गंभीर चिंता व्यक्त केली. स्थानबद्धांची गर्दी आणि निकृष्ट अन्न यांसह छावण्यांतील स्थिती अतिशय वाईट आहे. त्यातील ३३५ जण गेल्या तीन वर्षांपासून छावणीत स्थानबद्ध आहेत. सरकार अशा विदारक स्थितीतील आणि स्थानबद्धांचे मूलभूत अधिकार नाकारणाऱ्या बंधक छावण्या चालवू शकत नाही.

## वनाधिकार कायद्याला नकार

सर्वोच्च न्यायालयात वनाधिकार कायद्याविरोधात जो खटला चालू आहे त्यात वनाधिकार कायद्याची पाठराखण करण्यात मोदी सरकारला आलेल्या अपयशामुळे देशभरातील आदिवासी चिंतीत झाला आहे. आज २३ लाख आदिवासी कुटुंबापुढे त्यांना पट्टे नाकारल्यामुळे त्यांच्या जागेवरून हुसकावले जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. केंद्र सरकारने वनाधिकार कायद्याचा असंदिग्ध पाठपुरावा केला पाहिजे आणि कोणालाही हुसकावून लावले जाणार नाही याची खात्री दिली पाहिजे अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष करीत आहे. त्याचबरोबर मोदी सरकार आदिवासींना जंगलावरील आणि जंगलातील उत्पादनावरील हक्क नाकारणाऱ्या १९२७च्या वसाहतवादी कायद्यात दुरुस्त्या करून तो कायदा आणखीन अन्यायी बनवीत आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या दुरुस्त्या मागे घेण्याची मागणी करीत आहे. केंद्र सरकारकडून होत असलेल्या या हल्ल्यांविरोधातील आदिवासींच्या न्याय्य संघर्षास मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष पाठिंबा देत आहे.

**(पान ४ पहा)**

# ३७० कलमाची बरखास्ती : लोकशाही आणि संघराज्य प्रणालीवर एकाधिकारी आघात

प्रकाश कारत

मोदी सरकारने संविधान आणि संघराज्य प्रणाली यांवर सर्जिकल स्ट्राईक केला आहे. मोदी-शहा दुकलीने संविधानातील ३७०व्या कलमाचा गाभा नष्ट करून त्याच्या आधारे बनलेले कलम '३५ अ' रद्दबातल केले. त्याही पुढे जाऊन जम्मू-काश्मीर हे राज्यच बरखास्त केले आहे. त्याऐवजी त्या राज्याचे तुकडे पाडत दोन केंद्रशासित प्रदेश निर्माण केले आहेत.

हे कृत्य केले आहे चोरटेपणाने, जम्मू-काश्मीरच्या जनतेला नजरकैदेत ठेऊन आणि तिच्यावर दडपशाहीचा वरवंटा फिरवून. एवढेच नव्हे तर केंद्र सरकारने राष्ट्रपतींचा आदेश काढतानाही चक्क संविधानाचाच गळा घोटला आहे.

६ ऑगस्टपर्यंत भारतात २९ राज्ये होती. संसदेच्या दोन्ही सभागृहांनी जम्मू-काश्मीर पुनर्रचना विधेयक मंजूर करून ही संख्या २८ वर आणली. ही स्वतंत्र भारताच्या इतिहासातील अभूतपूर्व अशी घटना आहे. या कृष्णकृत्याद्वारे भाजपने 'कलम ३'चा भंग केला आहे. या कलमानुसार एखाद्या राज्याच्या सीमा बदलायच्या असल्यास वा नवे राज्य निर्माण करायचे असल्यास संबंधित राज्याच्या विधानसभेचे मत विचारात घेणे आवश्यक आहे. जम्मू-काश्मीरच्या बाबतीत सरकारने या कलमाचा भंग केला आहे. आजवर राज्यांचे अधिकार आणि संघराज्य प्रणाली यावर अशा प्रकारचा आघात कधीच करण्यात आला नव्हता.




जम्मू-काश्मीरला विशेष अधिकार देणारे '३७०' हे कलम देशाच्या घटना समितीने स्वीकृत केले होते. या कलमाने जम्मू-काश्मीरला इतर राज्यांहून वेगळा दर्जा देण्यात आला होता. त्यानुसार घटना बनवण्यासाठी त्या राज्याला स्वत:ची घटना समिती असण्याचा अधिकार होता. राज्य विधीमंडळ स्थापन करत असताना त्याला जास्त स्वायत्तता देऊन संसदेने केलेले कोणते कायदे त्या राज्याला लागू करायचे हे ठरवण्याचा अधिकार दिला होता.

## कलम ३७० ची पार्श्वभूमी

भारतात सामील होण्याआधी जम्मू-काश्मीर एक संस्थान होते. त्यात आताचे जम्मू-काश्मीर आणि पाकिस्तान व्याप्त काश्मीर सामावलेले होते. या संस्थानाचे राजे हरीसिंग भारतात सामील होण्यास तयार नव्हते. त्याला जम्मू-काश्मीर हे राज्य स्वतंत्र ठेवायचे होते. त्यामुळे १५ ऑगस्ट १९४७ रोजी याबाबतीत कोणताच निर्णय होऊ शकला नव्हता. शेख अब्दुल्लांच्या नेतृत्वाखालील नॅशनल कॉन्फरन्स राजेशाहीविरुद्ध लढत होती. त्या काळी भारतभर साम्राज्यशाही आणि राजेशाही यांच्या विरोधात लढे उभे राहिले होते. जम्मू-काश्मीरमधील हा लढाही त्याचाच भाग होता.

पण वायव्य सरहद्द प्रांतातून आक्रमक पठाणांच्या टोळ्या काश्मीरमध्ये घुसल्या; इतकेच नव्हे तर श्रीनगरच्या वेशीवर धडकू लागल्यावरच महाराजा हरीसिंग यांनी भारतात सामील होण्याच्या करारावर सही केली. हा सामिलीकरणाचा करार २६ ऑक्टोबर १९४७ रोजी झाला. काश्मीरची जनता त्या वेळी नॅशनल कॉन्फरन्ससोबत होती आणि तिने आक्रमकांचा जोरदार प्रतिकार केला. भारतीय लष्कर विमानाने श्रीनगरला पाठवण्यात आले आणि आक्रमकांना पाकिस्तानात परत हाकलण्यात आले.

याच काळात भारताच्या घटना समितीचे कामकाज सुरू होते. भारतीय घटनेचा मसुदा बनवला जात होता. त्या मसुद्यात ३७० कलम समाविष्ट करण्यात आले. ३७० कलम हा भारत सरकार आणि काश्मीरच्या जनतेचे प्रतिनिधी यांच्यातील करार होता. त्यात काश्मिरी जनतेची विशिष्ट अस्मिता राखण्याची, ती कायम ठेवण्याची हमी देण्यात आली होती. ही अस्मिता कश्मिरियत म्हणून ओळखली जाते.

भारतासाठी एका विशिष्ट कारणाने या करारास महत्त्व आहे. जेव्हा देशाची धर्माच्या नावाने फाळणी होत होती, भारत हे एक राष्ट्र नसून द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत मांडला जात होता अशा वेळी बहुसंख्य मुस्लीम असलेल्या राज्याने धर्मनिरपेक्ष भारतात सामील होण्याच्या बाजूने कौल दिला. फाळणीच्या काळात संपूर्ण वायव्य भारत धार्मिक दंगलींच्या आगीत जळत होता, त्या वेळी काश्मीरच्या खोऱ्यात स्वर्गीय शांतता नांदत होती. धार्मिक सलोखा आणि सामंजस्याचे विलोभनीय दर्शन काश्मिरी जनतेने जगाला दाखवून दिले.

## ३७० कलमाचा सततचा भंग

त्यानंतर ३७० कलमाने दिलेले वचन वारंवार मोडण्यात आल्याने काश्मीरची समस्या उग्र बनत गेली. या समस्येचे मूळ आहे त्या ऐतिहासिक वचनभंगात. १९५३ पासून सत्तेवर आलेल्या प्रत्येक काँग्रेस सरकारने ३७० कलमाने जम्मू-काश्मीरला दिलेल्या स्वायत्ततेची सतत पायमल्ली केली. ती स्वायत्तता कमी कमी करणारी धोरणे राबवली. १९६०, ७० आणि ८० च्या दशकात केंद्रीकरण आणि स्वायत्ततेचे अवमूल्यन काँग्रेस सरकारे वरचेवर करत आली. ३७० कलमात समाविष्ट करण्यात आलेले स्वायत्ततेचे बहुतेक मुद्दे काँग्रेस सरकारांनी पायदळी तुडवले. यातील पहिला आदेश १९५४ साली काढला आणि त्यानंतर २०१० पर्यंत काढलेल्या ४२ आदेशान्वये जम्मू-काश्मीरवर नवनवे कायदे लादत सत्तेचे केंद्रीकरण

वाढत ठेवले. केंद्राचा काश्मीरच्या कारभारातील हस्तक्षेप वाढवत नेला. ३७० कलमाच्या कक्षेत न येणारे कित्येक कायदे केले.

ए.जी. नुराणी या घटनातज्ज्ञांनी ही प्रक्रिया स्पष्ट दाखवून दिली आहे. त्यांच्या मते, ३७० कलमाचा आत्माच केंद्र सरकारने नष्ट करत आणला. केंद्राच्या यादीतील ९७ पैकी ९३ कायदे जम्मू-काश्मीरला अगोदरच लागू करण्यात आले आहेत.

## अलगतेचा अनुभव आणि दहशतवादाची सुरुवात

एका बाजूला जम्मू-काश्मीरला स्वायत्तता कमी करत असताना दुसरीकडे त्या राज्याला लोकशाही नाकारण्यात येत होती. वारंवार राज्याचे लोकशाही अधिकार दडपून टाकले गेले. निवडून आलेली सरकारे पाडण्यात आली. केंद्र सरकारने हस्तक्षेप करत निवडणुकीत गैरप्रकार करून त्या जिंकल्या. १९८७ची निवडणूक हे याचे ढळढळीत उदाहरण आहे. आपल्याला सावत्रपणाची वागणूक मिळत असल्याचा तिला वारंवार अनुभव येऊ लागला. यामुळे तेथील जनतेत अलगतेची भावना जोपासू लागली. या अलगतेच्या अनुभवातून 'आझादी'च्या घोषणेखाली सशस्त्र संघर्ष सुरू झाला. परिस्थिती काही काळ अशीच राहिल्यानंतर पाकिस्तानच्या मदतीने 'हिजबुल मुजाहिद्दीन' या इस्लामी संघटनेने आणि नंतर पाकिस्तानस्थित 'जैश ए महंमद' आणि 'लष्करे तोयबा' या कट्टर दहशतवादी संघटनांनी जनतेतील असंतोषाचा फायदा उपटायला सुरुवात केली.

नॅशनल कॉन्फरन्सने सुरू केलेल्या राजेशाहीविरुद्धच्या लढ्याला हिंदू धर्मांध संघटनांनी अगदी आरंभापासून विरोध केला होता. जनसंघाचा पूर्वसूरी असलेल्या 'प्रजा परिषदे'ने तर महाराजाला पाठिंबाच दिला होता. ३७० कलम आणि जम्मू-काश्मीरला स्वायत्तता द्यायला जनसंघ आणि हिंदू महासभा यांचा कट्टर विरोध होता. जनसंघ आणि पुढे भाजपच्या पाठीशी असलेल्या रास्वसंघाला भारतावर केंद्रीय सत्तेचा एकछत्री अंमल हवा आहे. त्यामुळे ते ३७० कलमाला सतत विरोधच करत आले आहेत. काश्मीर खोऱ्यात मुस्लीम बहुसंख्य असल्याने रास्वसंघ त्या जनतेला आणि प्रदेशाला शत्रू मानत आला आहे.

## जम्मू-काश्मीर खालसा करण्यामागील हिंदुत्ववादी कारस्थान

जम्मू-काश्मीरचे विभाजन करण्याची सीमेपलीकडील कट्टरवाद्यांची खूप जुनी इच्छा आहे. त्यांच्याप्रमाणेच रास्वसंघाचीदेखील धार्मिक पायावर त्या राज्याचे त्रिभाजन करण्याची दीर्घ काळ इच्छा राहिली आहे. हिंदुबहुल जम्मू, मुस्लिमबहुल काश्मीर खोरे आणि काही प्रमाणात बौद्ध बहुसंख्य असलेला लडाख असे त्रिभाजन करायची संघाची खूप जुनी योजना आहे. मुस्लिम बहुसंख्या असलेले जम्मू-काश्मीरचे संयुक्त राज्य त्यांना काट्यासारखे खुपत होते.

काश्मीर खोऱ्याच्या धार्मिक रचनेमुळे काश्मीरमध्ये अलगतावाद आणि दहशतवाद हा रास्वसंघ-भाजपचा आवडता सिद्धांत आहे. या त्यांच्या मुस्लिमविरोधी पूर्वग्रहदूषित दृष्टीमुळे ते काश्मिरी जनतेच्या लोकशाहीवादी आकांक्षांना सतत विरोध करत असतात. लष्कराच्या बळावर काश्मीर खोऱ्यातील जनतेला दडपून टाकले पाहिजे यासाठीच ३७० कलम रद्द करण्याची ते मागणी करत आले आहेत.

रास्वसंघ आणि मोदी-शहा दुकलीच्या काश्मीरविषयक भूमिकेत एक मूलभूत विरोधाभास आहे. काश्मीर हा जमिनीचा तुकडा त्यांच्या 'अखंड भारताचा' भाग आहे, पण काश्मिरी जनता मुस्लिम असल्याने ते अखंड भारताचे शत्रूच आहेत. जम्मू म्हणजे हिंदू आणि खोरे म्हणजे मुस्लिम अशी धार्मिक विभागणी करण्यासाठी रास्वसंघ-भाजप सतत पद्धतशीर प्रयत्न करत आले आहेत. २०१४ मध्ये मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून हे प्रयत्न मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आले. नागरी असंतोष आणि दहशतवाद यात फरक न करता जनतेचा असंतोषदेखील बळानेच मोडून काढला पाहिजे, तेथे कसलाही राजकीय संवाद घडता कामा नये, या त्यांच्या भूमिकेमुळे राज्याची परिस्थिती जास्तच बिघडली आहे. गेल्या काही वर्षांत स्थानिक तरुण वाढत्या संख्येने दहशतवादी बनले आहेत. या काळात मारले गेलेले सैनिक आणि दहशतवादी यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे ती स्थानिक तरुण मोठ्या संख्येने दहशतवादी बनल्यामुळेच, हे समजून घेतले पाहिजे.

## सारा प्रदेश एक तुरुंग

भाजपने काश्मिरी जनतेचा किती द्वेष करावा? संसदेने जम्मू-काश्मीरच्या बाबतीत घटनेत बदल करत असताना राज्यात हजारो सैनिक तैनात केले. प्रमुख राजकीय पक्षांच्या नेत्यांना स्थानबद्ध केले. इंटरनेट आणि मोबाईल फोन बंद ठेवून माहिती प्रसारण ठप्प करून टाकले. अमरनाथ यात्रा मध्येच थांबवून पर्यटकांना राज्यातून बाहेर काढले. अख्खा काश्मीर एक तुरुंगच बनवून टाकला. हे केले लोकशाहीने निवडून आलेल्या सरकारने. आपल्याच नागरिकांना सावत्रपणाची वागणूक देत, त्यांच्या जीवनात एक भयानक बदल करत लोकशाही तुडवत हे कृत्य केले.

## दिशाभूल

हिंदुत्ववादी नेहमी करत आलेले घिसेपिटे, ठोकळेबाज युक्तिवादच संसदेत ३७० कलम बरखास्त करत असताना गृहमंत्री अमित शहांनी केले. म्हणे, काश्मीर भारताशी एकात्म होण्यात ३७० कलम आडवे येते. खरे तर, काश्मिरी लोक भारतात स्वेच्छेने सामील झाले ते त्यांना दिलेल्या वचनांच्या आधारे, जी पुढे ३७० कलमात समाविष्ट करण्यात आली. काश्मिरींचे भवितव्य भारताशी कायमचे जोडले गेले ते या घटनात्मक तरतुदीच्या जोरावर.

३७० कलमामुळे जम्मू-काश्मीरमध्ये अलगतावाद आणि दहशतवाद फोफावला, असा दावा अमित शहांनी केला. वास्तविक, ३७० कलमाने दिलेली स्वायत्तता कमी करत आणल्याने, तेथील लोकशाहीची पाशवी दडपशाही केल्याने जनतेच्या मनात अलगतेची आणि असंतोषाची भावना निर्माण झाली. त्या भावनेला पाकिस्तान खतपाणी घालत आला. त्यातून फुटीरपणा आणि दहशतवाद फोफावला. जनतेच्या मनातील अलगतेवर मात करायची झाल्यास स्वायत्तता आणि लोकशाही यांची तेथे पुनर्स्थापना करणे, हाच मार्ग आहे.

३७० कलमामुळेच राज्याचा आर्थिक विकास झाला नाही, असा आरोप अमित शहांनी केला. खरे तर विकासास अडथळा आणला आहे गेल्या तीस वर्षांत वाढत राहिलेल्या दहशतवाद आणि हिंसाचारामुळे. राज्यात राजकीय उपाय न करता, शांतता प्रस्थापित न करता, परिस्थिती सुरळीत न होता राज्याचा आर्थिक विकास करता येईल, तेथे रोजगार वाढवता येईल, खासगी गुंतवणुकीचा ओघ सुरू होईल, हे अमित शहांचे निव्वळ दिवास्वप्न आहे.

अमित शहांनी आणखी एक हास्यास्पद दावा केला आहे. म्हणे, ३७० कलमामुळे राज्यात भ्रष्टाचार वाढला, सार्वजनिक पैशाची लूट झाली! भ्रष्टाचाराने तेथील प्रशासन पोखरले आहे, हे खरे आहे. पण उत्तरदायित्व

आणि लोकशाहीचा अभाव यामुळे तेथे भ्रष्टाचार वाढला आहे. सुमारे दहा वर्षाहून अधिक काळ जम्मू-काश्मीर हे पोलीस राज्य असून त्यावर केंद्र सरकारचा अंमल चालू आहे. भ्रष्टाचाराचे उगमस्थान आहे ते या पोलिसी राजवटीत, केंद्र सरकारच्या प्रशासनात आणि त्यांच्याशी लागेबांधे असलेल्या राजकीय व्यवस्थेत.

## संविधानाची फसवणूक

मोदी सरकारने या बाबतीत भारताच्या संविधानाचीच घोर फसवणूक केली आहे. त्यांच्या या कृतीतून आज देशावर एकाधिकारी सत्ता कशी प्रस्थापित झाली आहे, हेच दिसून येते. संविधानाच्या दुसऱ्या कलमात, कलम ३६७ मध्ये, बदल करण्यासाठी ३७० कलमाचा वापर करण्यात येऊन अध्यक्षीय आदेश जारी करण्यात आला. इतकेच नव्हे तर ३७० कलमाचा आत्मा नष्ट करण्यासाठी ३७० कलमाचाच वापर करण्यात आला. त्या राज्यात अध्यक्षीय राजवट आहे. तेथील विधानसभेचे अधिकार राज्यपालांच्या ताब्यात म्हणजेच केंद्र सरकारच्या ताब्यात आहेत. ३७० कलमानुसार राष्ट्रपतींच्या आदेशाला राज्य विधानसभेची मान्यता लागते. तेथे राष्ट्रपती राजवट असल्याने राष्ट्रपतींनीच राष्ट्रपतींच्या आदेशाला मान्यता देण्याचा अभूतपूर्व प्रसंग घडला आहे!

बिजू जनता दल, वाय एस आर काँग्रेस, तेलुगु देसम, तेलंगण राष्ट्र समिती आणि इतर काही प्रादेशिक पक्षांनी या घटनाविरोधी कृत्याला पाठिंबा दिला. याचे कारण मोदी सरकार विरोधी पक्षांवर करत असलेली दडपशाही. या प्रादेशिक पक्षांनी संघराज्य प्रणालीचाच घात केला आहे. याला म्हणतात, कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ!

३७० कलमाने दिलेल्या स्वायत्ततेचे कडबोळे केले मुळात काँग्रेस पक्षाने. याबाबतीत त्यालाही आपले घर सांभाळता आले नाही.

## दीर्घकालीन लढा

राष्ट्रपतींच्या अध्यादेशाला आणि स्वीकारण्यात आलेल्या विधेयकाला न्यायालयात आव्हान मिळणार, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. पण काश्मिरी जनतेला दिलेल्या वचनाचा भंग करण्याच्या या दुष्कृत्याविरुद्धचा लढा प्रदीर्घ काळ चालणार आहे. हा लढा केवळ जम्मू-काश्मीरचा नाही. तो भारताची लोकशाही आणि संघराज्य प्रणाली वाचवण्याचा लढा आहे.

संविधानाच्या ३७० कलमाने जम्मू-काश्मीरला दिलेल्या स्वायत्ततेची माकप सतत पाठराखण करत आला आहे. आपला पक्ष राज्याला जास्तीत जास्त आणि जम्मू, खोरे आणि लडाख यांना राज्यांतर्गत स्वायत्तता मागत आला आहे. भाजपची भूमिका नेमकी याच्या विरुद्ध आहे. दहशतवाद्यांच्या सशस्त्र हिंसाचाराचा खंबीरपणे बिमोड केलाच पाहिजे आणि सीमेपलीकडून होत असलेल्या दहशतवादावर कठोर उपाय केलेच पाहिजेत, अशीच पक्षाची भूमिका आहे. पण राज्याचे प्रश्न राजकीय आहेत, त्यासाठी राजकीय संवाद घडवलाच पाहिजे, अशीही आपली भूमिका आहे.

३७० कलम रद्द करून काश्मीर भारताशी अशा रीतीने 'एकात्म' करण्याच्या भाजपच्या या कृतीला जनतेच्या काही विभागांचा पाठिंबा मिळाला आहे. त्यांचा मोदी सरकार दहशतवादाचा आणि फुटीरतावाद्यांचा ठोस बंदोबस्त करत आहे, असा गैरसमज झाला आहे. ते मोदी सरकारच्या प्रचाराला बळी पडत आहेत. पण लांब पल्ल्याच्या दृष्टीने जम्मू-काश्मीरला कोणत्या खाईत भाजप सरकार लोटत आहे, हे अजून त्यांच्या ध्यानात येत नाही.

हे काम डाव्या आणि लोकशाही शक्तींना करावे लागेल. जम्मू-काश्मीरचा धर्मनिरपेक्ष वारसा जोपासण्याचा लढा देशातील व्यापक धर्मनिरपेक्षतेच्या रक्षणासाठी महत्त्वाचा आहे. दोन्ही लढे एकत्र लढावे लागतील. हिंदुत्ववादी एकाधिकारशाहीविरुद्ध लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि संघराज्य प्रणालीचे संरक्षण करण्यासाठी आपल्याला पुढाकार घेतलाच पाहिजे.

**(अनुवाद : डॉ. उदय नारकर)**

---

## (रात्र वैऱ्याची आहे... पान १० वरून)

व कायदेशीररित्या वनक्षेत्रातील आदिवासीला/ बिगर आदिवासीला कोणत्या प्रकारे बेदखल केले आहे याचा तपशील दिलेला नाही आणि आदिवासींच्या या जंगल जमिनीच्या प्रकरणाबाबत आदिवासींना पूर्वसूचना दिलेल्या नोटिसेस कायदेशीररित्या दिलेल्या होत्या की नाही हे स्पष्ट झाले नाही.

या सर्व बाबतीत अतिमहत्त्वाची गोष्ट म्हणजे असे आदेश योग्य त्या अधिकाऱ्याने उचित अधिकार वापरून तो आदेश पारित केला आहे किंवा नाही हे बारकाईने तपासून शिक्कामोर्तब करण्यासाठी एक 'देखरेख समिती' स्थापन करावी लागते. पण तसे झालेले दिसत नाही.

थोडक्यात, प्रत्येक राज्यातील उच्चदर्जाच्या सेक्रेटरींनी नवीन शपथपत्र सर्वोच्च न्यायालयात दाखल करून त्यात खालील बाबी तपशीलवार सादर कराव्यात असा आदेश न्यायालयाने दिला.

नामंजूर केलेले आदेश आणि त्यात दावे कशाप्रकारे व कोणत्या कायदेशीरप्रक्रियेद्वारे नामंजूर करण्यात आले, आदेश हा कारणासहित पारित केलेला असावा, त्यात मुख्य कारण नमूद केले जावे, तसेच आदिवासींना वाजवी संधी देऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेतले होते व तपशीलवार पुरावे कोणत्या प्रकारे सादर करण्याची त्यांना संधी दिली होती हे खास करून शपथपत्रात तपशीलवार नमूद करावे. हे न्यायालयाने निर्देशित केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दि. २८ फेब्रुवारी २०१९च्या आदेशात खास नमूद केले आहे की, या जंगलातील आदिवासींच्या पारंपरिक जमिनी आणि त्यांचे हक्क काढून न घेता कोणत्याही प्रकारे धनाढ्य आणि बाहुशाली लोकांच्या हातात, उद्योगपती आणि बिगर आदिवासी यांच्या हातात वनजमिनी जाणार नाहीत ही जबाबदारी शासनाने घेतली पाहिजे. तसेच जंगलामध्ये ज्यांनी कंपन्यांद्वारे व इतर मार्गाने प्रवेश करून जमिनीचा कब्जा मिळवला आहे ते कोणत्या क्षेत्रातील आहेत, बिगर आदिवासींच्या कोणत्या संवर्गातील आहेत हे स्पष्टपणे नमूद करावे.

हे सर्व तपशील सर्वोच्च न्यायालयापुढे सादर करण्यासाठी व त्याचा तपास करण्यासाठी न्यायालयाने दिनांक १३ फेब्रुवारी २०१९ रोजी पारित केलेला व जमिनीवरचे अतिक्रमण तात्काळ हटवण्याचा आदेश स्थगित केलेला आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर सर्व कार्यकर्ते व आदिवासी बांधवांना सावधगिरीची सूचना द्यावीशी वाटते की, शासनाची सर्व प्रकारची प्रचारकी भजनी मंडळी आणि तथाकथित वनमित्र संघटना महाराष्ट्रात जंगलजमीन नोंदवण्याच्या नावाखाली जर आदिवासींना बेदखल करण्याचा प्रयत्न करीत असतील तर तो आपल्याला रोखावा लागेल. तसेच हेही पाहावे लागेल की, वनक्षेत्रातील शासकीय अधिकाऱ्यांनी या आदिवासींच्या नावाची नोंद 'परंपरागत' आदिवासी, त्यांची विशिष्ट जमात, बोलीभाषा इ. प्रकारे जनगणना पत्र तसेच वन पंचायतीमध्ये केली आहे किंवा नाही हे सुद्धा प्रत्येकाला तपासावे लागेल.

★ ★ ★

# रात्र वैऱ्याची आहे, जंगलच्या राजाने जागे रहावे


## आदिवासींना वनविभागातील परंपरागत कसणाऱ्या जमिनीचा ताबा/अधिकार आणि सर्वोच्च न्यायालयाचे सध्याचे आदेश

अश्मसार

सर्वोच्च न्यायालयात 'Wild Life First' (प्रथम संवर्धन वनजीवनाचे) या संघटनेने वनजीवन सुरक्षित रहावे, त्यात जंगल जमिनी, जंगलातील सर्व सजीव प्राणी व सृष्टी आणि इतर पर्यावरण संरक्षित रहावे, या नावाखाली एक याचिका सन २००८ मध्ये दाखल केली होती.

याचिकेतील सुरुवातीचा उद्देश उत्तम दिसतो. परंतु सर्वोच्च न्यायालयाने जेव्हा नेमके वनक्षेत्र कोणते आहे आणि किती जंगल शिल्लक आहे आणि ती कोणाच्या ताब्यात आहे, तसेच आदिवासींच्या नावाने किती प्रमाणात जमीन ताब्यात राहिली आहे याची माहिती सर्व राज्यांकडून मागवण्यास सुरुवात केली तेव्हा अनेक बाबींचा उलगडा होऊ लागला.

२००८ ते २०१५ पर्यंत या याचिकेला फारसे महत्त्वच कोणी दिले नव्हते. परंतु जसजसा वेगवेगळ्या बड्या बहुउद्देशीय कंपन्या तसेच त्यांच्या नावाने चालू असलेल्या विविध एजन्सीस यांचा जंगलांमध्ये व आदिवासींच्या जमिनीवर मोठ्या प्रमाणात शिरकाव झाल्यानंतर अतिक्रमण मोठ्या प्रमाणात वाढले.



हाच तो काळ ज्या काळात कॉर्पोरेट क्षेत्रातील कंपन्या, विशेषत: ज्या नवीन कायद्यातील 'विशेष आर्थिक क्षेत्रांमध्ये' शासकीय सवलतींद्वारे अत्यंत स्वस्तात जमिनी विकत घेऊन त्यावर विविध उद्योग चालू करत होत्या. त्यात खाणी, औषधी कंपन्या, कागद, कोळसा, विडी उद्योग तसेच साबण कंपन्या (जंगलातील विशिष्ट झाडांच्या बियांमधून तेल काढणे) याचा अतिवेगाने शिरकाव झाला आणि जंगलावरचा आदिवासींचा अधिकार हळूहळू कमी होऊ लागला. त्याचवेळी जे नवीन कायदे आदिवासींच्या जंगलांचे आणि जंगलजमिनीचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने तयार केले होते त्यातील आदिवासी आणि इतर परंपरागत जंगल जमिनीवर वस्ती करून राहणारे व त्यांचा जंगलातील हक्क कायदेशीररित्या नोंद करणारा अधिनियम २००६, आणि त्याखालील नियम २००८ हे अमलात आले. तरीही या काळातच फार मोठ्या प्रमाणात जंगलातल्या कायद्यांमध्ये बदल झाला. आणि आदिवासींच्या नावाने असणाऱ्या जमिनी वेगाने बिगर आदिवासींच्याकडे आणि लहानमोठ्या उद्योगांकडे हस्तांतरीत होऊ लागल्या.

मध्यंतरीच्या काळात आदिवासींच्या हक्कांवर वारंवार होणारे अतिक्रमण, शासनाने पाशवी बळाच्या साहाय्याने केलेला आदिवासींवरचा हल्ला व तसेच मोठ्या प्रमाणात होणाऱ्या चळवळी दडपून टाकण्याची प्रक्रिया उजेडात येऊ लागली.

सर्वोच्च न्यायालयासमोरही यातील काही बाबी उघडकीस आल्या. आश्चर्यकारक म्हणजे सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या १०९/२००८ या याचिकेमधील छत्तीसगड राज्य शासनाने २०१८ मध्ये दाखल केलेल्या शपथपत्रात फक्त २०९५ आदिवासींनी जंगलजमिनीवरचा हक्क अर्ज केलेला असल्याचे सांगितले. आणि त्यांचा अधिकार वनक्षेत्रातील अधिकाऱ्यांनी नामंजूर केला असल्याचेही नमूद केले. छत्तीसगडसारख्या घनदाट जंगलात इतके कमी आदिवासी कसे आणि त्यांची नोंद योग्यप्रकारे शासकीय अधिकाऱ्यांनी केली आहे की नाही याचा बारकाईने तपास करण्याची गरज आहे. यातून न्यायालयापुढे बारीकसारीक तपशील सादर केलेला नाही वा लपवलेला आहे असे दिसते.

महाराष्ट्रातील आकडेवारीसुद्धा धक्कादायक दिसते. महाराष्ट्र शासनाने जे शपथपत्र दाखल केलेले आहे त्यामध्ये २,५४,०४२ आदिवासींनी जमिनीच्या हक्काचा दावा केलेला आहे असे नमूद केले आणि १,०५,६८१ इतर जंगल जमातीने जमिनीवरचे हक्क नोंदलेले आहेत. त्यापैकी १३,७१२ आदिवासींचे दावे आणि ८,७९७ इतर जंगल जमातींचे दावे शासनाने नाकारले आहेत.

गुजरात राज्यानेदेखील आदिवासींनी १,६८,८९९ आणि १३,९७० बिगर आदिवासींनी दावे दाखल केले असल्याचे सांगितले. परंतु शपथपत्रामध्ये किती जणांचे दावे नामंजूर केले त्याबद्दलचा तपशील बिलकुल दिलेला नाही. त्याबद्दलचा तपशील न्यायालयाने मागितला आहे.

केरळ राज्यात जंगल जमिनीच्या अधिकाराबाबत तपशीलवार प्रक्रिया शासकीय अधिकाऱ्यांनी पूर्ण केली नव्हती, ३९,९९९ दावे आदिवासी जमातीचे दाखल केलेले दिसतात. त्यापैकी ८९४ दावे नामंजूर करण्यात आले आहेत.

सारांश जरी इतर सर्व राज्यांनी तपशील देण्याचा प्रयत्न केला असला तरी एक बाब स्पष्ट झालेली आहे, ती ही की `Forest Survey' खात्याकडे तपशीलवार माहिती नाही आणि नेमके अतिक्रमण कोणते व कोणी केले आहे त्याची नोंद अजिबात नाही. हे स्पष्ट दिसते म्हणून केंद्र सरकारच्या `Forest Survey Department' ने असा तपशील सादर करण्यासाठी 'प्रदीर्घ कालावधी' सर्वोच्च न्यायालयाकडे मागितला आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या माहितीच्या बाबतीत झालेला गोंधळ आणि अनेक खऱ्या खोट्या बाबी उघडकीस येण्याची भीती पाहून सर्वोच्च न्यायालयातील केंद्र सरकारचे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी विनंती केली की, कोर्टापुढे सादर केलेल्या पुराव्यात अनेक बाबी स्पष्ट होत नाहीत आणि त्यामुळे विविध राज्यांतील जंगलातील आदिवासींचे नेमके किती दावे नाकारलेले आहेत, हे स्पष्ट होत नाही. तसेच कोणत्या अधिकाऱ्याने त्याच्या नेमक्या अधिकार शक्तीद्वारे ते नाकारलेले आहेत (कलमाखाली)


(पान ९ पहा)

# कार्ल मार्क्सचे जीवनकार्य (२०)

# पहिल्या आंतरराष्ट्रीय संघटनेचा जन्म

जर्मनीतील कामगार संघटनांशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी आणि आधीच्या दोन 'ऱ्हाईनिश' वृत्तपत्रानंतर एक नवे वृत्तपत्र सुरू करणे कितपत शक्य आहे हे पडताळून पाहण्यासाठी मार्क्स १८६१ साली बर्लीनला गेला होता. नवे वृत्तपत्र सुरू करण्याची सूचना मार्क्सला एक वकील, लेखक आणि कामगार चळवळीचा नेता असलेल्या फर्डिनॅण्ड लासाल याने केली होती.

परंतु खुद्द लासालच इतरांपेक्षा फार वेगळ्या व विक्षिप्त मनोवृत्तीचा इसम असल्यामुळे नव्या वृत्तपत्राचा आपला बेत सफल झाला नाही याची मार्क्सला फार खंत वाटत होती. मार्क्स व एंगल्स यांचा आपण शिष्य आहोत असे लासाल म्हणत असे. परंतु प्रत्यक्षात मात्र त्याने क्रांतिकारी सिद्धांतांचा कधीही स्वीकार केला नव्हता. सिद्धांत आणि प्रत्यक्ष कृती या दोन्ही बाबतीत लासाल एक अध्यात्मवादी आणि सुधारणावादीच राहिला होता. याच्याच जोडीला लासालचा अवाजवी अहंभाव आणि आपण स्वत: एक निर्विवाद नेता असल्याचे त्याचे पोकळ दावे, या कारणापायी लासालबरोबर जोडीने काम करून एक क्रांतिकारी वृत्तपत्र काढणे मार्क्सला शक्यच नव्हते.



त्याचबरोबर प्रशियात मुक्तपणे प्रवेश करता यावा, तेथे वास्तव्य करता यावे यासाठी प्रशियाचा एक नागरिक म्हणून आपले स्थान आपल्याला परत दिले जावे अशी विनंती जेव्हा मार्क्सने प्रशियाच्या सत्ताधिकाऱ्यांना केली, तेव्हा त्यांनी मार्क्स एक 'प्रजासत्ताकवादी' आहे हे कारण पुढे करून मार्क्सची विनंती फेटाळून लावली होती. स्वत: मार्क्सला सहजगत्या जर्मनीला परतणे शक्य नसल्यामुळे आपल्या मायभूमीतील एकनिष्ठ अशा साथींशी सातत्याने संबंध राखणे मार्क्सच्या दृष्टीने फार महत्त्वाचे होते. जर्मनीत काम करणाऱ्या या कॉम्रेडपैकी विल्हेल्म लायक्नेक्ट हा कॉम्रेड दीर्घकाळ एक महत्त्वाचा आणि वजन असलेला कॉम्रेड होता.

१८६२च्या दरम्यान 'बर्लीन' व 'लायपसिंग' या शहरातील सर्वाधिक प्रगत अशा जर्मन कामगारांना, कामगारवर्गाची सामाजिक आणि राजकीय उद्दिष्टे ठरविण्यासाठी, सर्व जर्मन कामगारांची एक परिषद (Congress) बोलवावी असे तीव्रपणे मार्क्सला वाटू लागले होते. १८६२च्या मे महिन्यात लायपसिग शहरात 'जर्मन वर्कर्स असोसिएशन' स्थापन करण्यात आले व लासाल या 'संघटनेचा' अध्यक्ष म्हणून निवडून आला.

## लासालचा सुधारणावाद

अत्यंत काळ्याकुट्ट अशा प्रतिगामी विचारसरणीचा एक दशकाहून अधिक काळ लोटल्यानंतर पहिल्यांदाच जर्मनीत, बुर्झ्वझीच्या प्रभावापासून मुक्त अशी कामगारांची एक स्वतंत्र संघटना पुन्हा अस्तित्वात येत होती. वर्गीय जाणीव असलेले फक्त कामगारच नव्हेत तर बुद्धिजीवींनासुद्धा आशेचा किरण दिसू लागला व ते स्वत: कामगारचळवळीच्या बाजूने किंवा कामगारांच्या बाजूने उभे राहिले.

मार्क्स आणि एंगल्स यांच्या लिखाणाविषयी लासालला इतर अनेकांपेक्षा जास्त माहिती होती व कित्येकदा तो आपण स्वत: मार्क्स व एंगल्स यांचा शिष्य आणि समर्थक असल्याचे बोलून दाखवीत असे. परंतु वस्तुत: लासालला मार्क्सच्या शिकवणीतील मौल्यवान संकल्पनांचे कधीही आकलन झाले नव्हते. विशेषत: मार्क्सच्या मूलभूत तत्त्वज्ञानविषयक भौतिकवादाची (Philosophical Materialism) लासालची उमज कमीच होती. इतिहास आणि बुर्झ्वा राज्य या विचारांबाबत लासाल अध्यात्मवादीच राहिला होता. राजकीय सत्ता काबीज करून कामगारवर्गच वर्गसंघर्षातून एक नवी समाजवादी व्यवस्था उभी करण्याची ऐतिहासिक भूमिका (Historical Mission) बजावील हा मार्क्सचा सिद्धांत लासालला पटत नव्हता.

'बुर्झ्वा' राज्यसंस्था नष्ट करण्याऐवजी या राज्यात सुधारणा करणे हे कामगारवर्गाचे काम असले पाहिजे असे लासालचे मत होते. तसेच प्रशियाच्या राज्यातसुद्धा काटेकोरपणे संसदीय पद्धतीनुसार गुप्तमतदानाचे समान हक्क अमलात आणून लासालला सुधारणा करायच्या होत्या. आणि कामगारांना उधारी देऊन श्रीमंत जमीनदारांच्या प्रशियन राज्याने (Janker State) स्वत:च्या उत्पादनासाठी सहकारी संस्था सुरू कराव्यात असे लासालने सुचविले होते. याचा अर्थ लासालला सावकारी जमीनदारांचे राज्यच चालू ठेवायचे होते.

जर्मनीच्या प्रभावापासून मुक्त अशी 'The General Workers Association' ही कामगार संघटना पुन्हा एकदा उभी करण्यात लासालने केलेली मदत सकारात्मक होती, हे खरे. परंतु लासालच्या काही भ्रामक कल्पनांचे - उदाहरणार्थ, कामगारवर्गाने स्वत:ला क्रांतिकारी लढ्यामध्ये गुंतवून ठेवण्याची गरज नव्हती; किंवा शोषक राज्यांच्या मदतीने कामगारवर्ग शांततापूर्ण मार्गाने समाजवादापर्यंत जाईल- इत्यादिचे परिणाम मात्र घातक होते.

या अशा 'पेटी बुर्झ्वा' आणि गैर-कामगारवर्गीय कल्पनांच्या आधारे लासालने चक्क चुकीच्या संकल्पनांची एक प्रणाली तयार केली. ऐतिहासिकदृष्ट्या ही प्रणाली 'लासाल्यिनिझम' (Lassleanism) म्हणून ओळखली जाते- उदाहरणादाखल : कामगारांचे आर्थिक लढे आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या कामगारचळवळी लासालने फेटाळून लावल्या. शेतकरीवर्ग आणि पेटी-बुर्झ्वा वर्ग या कामगारवर्गीय दोस्तांचा लासालला तिरस्कार वाटे. कामगारांच्या मुक्तिलढ्याला एक आंतरराष्ट्रीय बाजू आहे हे लासालला मान्य नव्हते.


## वाढीमध्ये अडथळे

परंतु जर्मनीच्या कामगारवर्गासाठी अत्यंत हानीकारक परिस्थिती निर्माण झाली ती लासालच्या कटकारस्थानांमुळे. एकीकडे जर्मन भाषिक राज्यांचे एकत्रीकरण प्रशियाच्या नेतृत्वाखाली असले पाहिजे या दृष्टिकोनातून, लासाल प्रशियाचा नवा प्रधानमंत्री बिसमार्क याच्याशी गुपचूप वाटाघाटी करीत होता, तर दुसरीकडे 'जर्मन वर्कर्स असोसिएशन' ही संघटना क्रांतिकारी लोकशाही मार्गापासून दुसऱ्या दिशेला म्हणजे प्रशियाच्या राष्ट्रीय दुराभिमानाकडे वळविण्यासाठी लासालचे प्रयत्न चालू होते.

१८६० साली लोकशाही मार्गाने जर्मनीचे एकत्रीकरण करण्याच्या लढ्यातील एक निर्णायक शक्ती म्हणून उदयास येत असलेल्या कामगारांच्या चळवळीमध्ये लासाल आडकाठी आणत होता व आपले विचार जर्मन कामगारांच्या संघटनेवर लादून कामगारवर्गात शास्त्रीय समाजवादाची संकल्पना रुजविण्याच्या प्रक्रियेमध्ये लासाल अडथळे आणण्याचे काम करीत होता.

अशाप्रकारे 'जर्मन वर्कर्स असोसिएशन'ला एक सशक्त क्रांतिकारी कामगार पक्ष बनविण्यापासून लासालने अलिप्त ठेवले होते.

जर्मन कामगार आणि संपूर्ण जर्मनीचा कट्टर शत्रू असलेल्या प्रशियाच्या लष्करी राज्याबरोबर कटकारस्थाने करण्यात लासालला काहीच वावगे वाटत नव्हते. हे पाहून मार्क्सला धक्का बसला. १८६३ साली एंगल्सने मार्क्सला लिहिले होते, 'जर्मनीमध्ये लासाल करीत असलेली उठाठेव आणि त्याचे विचित्र वर्तन, तापदायक होत चालले आहे. तुला तुझे पुस्तक लवकरच पुरे करायला हवे.' यापुढे नव्या शास्त्रशुद्ध आणि राजकीय लिखाणाद्वारे कामगारवर्गाला प्रभावित करणे अगत्याचे आहे हे दोघांना कळून चुकले होते. मार्क्ससाठी सर्वप्रथम 'Das Capital' हा महत्त्वाचा ग्रंथ पुरा करणे हे प्रमुख काम होते. १८६१च्या मध्यापासून या पुस्तकावर अधिक खोलात शिरून मार्क्स काम करीत होताच. त्याचबरोबर इतर युरोपियन देशांमध्ये कामगारांच्या चळवळीसाठी मार्क्सने आणखी जोमाने काम करण्यास सुरुवात केली होती.


Das Kapital.

Kritik der politischen Oekonomie.

Von

Karl Marx.

Erster Band.

Buch I: Der Produktionsprocess des Kapitals.

Hamburg

Verlag von Otto Meissner.

1867.

New-York: L. W. Schmidt, 24 Barclay-Street.

## पोलंडचा प्रश्न

१८६३च्या सुरुवातीपासून पोलंडच्या जनतेने जेव्हा पुन्हा एकदा झारच्या सत्तेविरोधात उठाव केला, तेव्हा मार्क्स त्यांच्या पाठिशी मोठ्या हिमतीने उभा राहिला होता. त्यावर्षी ऑगस्ट महिन्यात मार्क्सला भेटण्यासाठी गेलेल्या पोलंडच्या देशप्रेमींच्या एका प्रतिनिधी मंडळाला, त्यांचे मनोबल वाढविण्यासाठी मार्क्सने नैतिक पाठबळ दिलेच शिवाय साधनसामुग्रीदेखील दिली. तसेच पोलंडच्या देशप्रेमींसाठी दृढैक्याच्या वृत्तीचे (Solidarity Action) नेतृत्व करण्यासाठी मार्क्सने लंडनमध्ये 'कम्युनिस्ट वर्कर्स एज्युकेशन असोसिएशन' या संघटनेला प्रवृत्त केले.

'कम्युनिस्ट वर्कर्स एज्युकेशन असोसिएशन'ने वाटलेल्या छापील हस्तपत्रिकेत मार्क्सने लिहिले होते 'पोलंडचा प्रश्न हा जर्मनीचा प्रश्न आहे. स्वतंत्र पोलंडशिवाय जर्मनी एक स्वतंत्र व संयुक्त असे राष्ट्र होऊच शकत नाही.' मार्क्सने हे कळकळीचे निवेदन जर्मन कामगारांपर्यंत पोहोचावे म्हणून या पत्रिकेच्या ५० प्रती लायब्नेक्टसाठी जर्मनीला पाठवण्यात आल्या होत्या.

मार्क्सने जर्मन कामगारांना स्पष्टपणे सांगितले, 'जर्मनीने पोलंडचा विश्वासघात केला आणि त्याचवेळी खुद्द जर्मनीचा आणि युरोपचाही विश्वासघात केला आहे. याचा जबरदस्त निषेध करण्यासाठी जर्मन कामगारांची बांधिलकी या निर्णायक क्षणी पोलंडच्या जनतेशी असली पाहिजे, तसेच संपूर्ण जगाशी व त्यांच्या स्वत:च्या प्रतिष्ठेशी असली पाहिजे. जर्मन कामगारवर्गाने आपल्या राष्ट्रीय ध्वजावर 'पोलंडचे पुनर्घटन'- (Reconstitution of Poland) असे जळजळीत अक्षरात लिहायला हवे.' मार्क्सने जर्मन कामगारांमध्ये 'कामगारवर्गाचे आंतरराष्ट्रीयत्व' या संकल्पनेचा प्रसार केला व कामगारवर्गच जर्मनीच्या राष्ट्रीय हिताचे खरे विश्वस्त आहेत ही जाणीव जर्मन कामगारांमध्ये रुजविली. प्रगतिशील अशा ब्रिटिश व फ्रेंच कामगारांनीदेखील पोलंडच्या देशप्रेमींना पाठिंबा दिला.

## आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना

मार्क्सच्या प्रोत्साहनामुळे युरोपियन देशांमध्ये सुरू झालेल्या या महत्त्वपूर्ण चळवळीच्या परिणामी आंतरराष्ट्रीय कामगारसंघटना स्थापन करण्याची पार्श्वभूमी तयार होत होती. युरोपमधील वेगवेगळ्या देशांतील कामगारचळवळी पुन्हा एकदा जोरदारपणे सुरू होऊ लागल्या होत्या. त्यामुळे एंगल्सने पुढे कधीतरी लिहिल्याप्रमाणे, 'युरोप आणि अमेरिका या सारख्या अत्यंत प्रगत देशांमध्ये कामगार संघटना स्थापन करण्याची, मार्क्सने दीर्घकाळ मनी बाळगलेली इच्छा आता पूर्ण करणे शक्य होते. कामगारवर्गाला उत्तेजन देण्यासाठी, त्यांचे सशक्तीकरण करण्यासाठी आणि शत्रूवर्गाच्या थेट मर्मावरच घाव घालण्यासाठी ही कामगारसंघटना, कामगारांना, बुर्झ्वाझीला आणि सरकारला, समाजवादी चळवळ आंतरराष्ट्रीय स्वरूपाची चळवळ असल्याचे सिद्ध करून दाखवील.'

त्यासाठी कामगारवर्गाला योग्य संधी मिळाली १८६३ साली. 'ब्रिटिश ट्रेड युनियन'च्या महासंघाने लंडनमध्ये आयोजित केलेल्या एका आंतरराष्ट्रीय सभेला हजर राहण्यासाठी फ्रेंच कामगारांच्या प्रतिनिधींना, पोलंड कामगारांच्या उठावाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी निमंत्रित केले होते. त्यानंतर १८६४च्या आंतरराष्ट्रीय बैठकीत पुन्हा हे आंतरराष्ट्रीय दृढैक्य व्यक्त करण्यात यावे असे एकमताने ठरविण्यात आले होते. या बैठकीत सहभागी होऊ असा शब्द इतर देशांतील कामगारांनीसुद्धा दिला होता. त्यामध्ये बहुतांशी कम्युनिस्ट वर्कर्स एज्युकेशन असोसिएशनचे जर्मन कामगार होते. कार्ल मार्क्सविषयी नितांत आदर असणाऱ्या ब्रिटिश कामगार नेत्यांनी, आंतरराष्ट्रीय कामगारांचा बंधुभाव व्यक्त करणाऱ्या या बैठकीला कार्ल मार्क्सने अगत्याने हजर राहावे अशी विनंती केली होती.

१८६४ साली २८ सप्टेंबरच्या संध्याकाळी शेकडोंच्या संख्येने ब्रिटिश, फ्रेंच, जर्मन कामगार तसेच पोलंड, इटली आणि स्वित्झर्लंडचे कामगार आणि लोकशाहीवादी स्थलांतरित लंडनच्या 'सेंट मार्टिन हॉल' मध्ये जमले होते. हा हॉल अगदी छपराच्या वाशापर्यंत भरगच्च भरला होता. जर्मन कामगारांचा प्रतिनिधी म्हणून मार्क्स व्यासपीठावर होता व मार्क्सच्या बाजूला फ्रेंच कामगारांचे प्रतिनिधी, ब्रिटिश कामगारसंघटनेचे नेते, इतर राष्ट्रांचे प्रतिनिधी आणि क्रांतिकारी लोकशाहीवादी व्यासपीठावर होते.

जमलेल्या प्रेक्षकांनी ब्रिटिश कामगारांकडून फ्रेंच कामगारांना पाठविण्यात आलेल्या दृढैक्याचा संदेश आणि फ्रेंच कामगारांकडून ब्रिटिश कामगारांना मिळालेला प्रतिसाद आनंदाने मंजूर झाला. येत्या काळात कामगारांचे एक आंतरराष्ट्रीय संघटन अस्तित्वात येण्याची शक्यता असल्याचे, आपले कॉम्रेड्स म्हणत असल्याची खबर फ्रेंच कामगारांच्या एका प्रतिनिधीने सभेला दिली. ब्रिटिश कामगारसंघटनेच्या एका नेत्याने संध्याकाळच्या सभेमध्ये अनेक वक्त्यांनी मांडलेला दृष्टिकोन थोडक्यात समजावून सांगितला. त्या वक्त्यांपैकी एक होता जर्मन कम्युनिस्ट 'ईक्वारिअस'. या सभेपुढे मार्क्स स्वत: जर्मन कामगारांच्या वतीने बोलला नव्हता. परंतु या सभेची तयारी करण्यासाठी नेमलेल्या कमिटीला मार्क्सने स्वत:हून 'ईक्वारिअस'चे नाव सुचविले होते व ईक्वारिअसच्या भाषणाचे प्रारूप तयार करण्यासाठी त्याला मदत केली होती.

लोकशाही हक्कांचे स्वातंत्र्य, राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि सामाजिक उन्नती या उद्दिष्टांसाठी संघर्ष करण्यास सर्व देशांतील कामगारांना कळकळ होती हे सर्व वक्त्यांनी ओळखले होते. आणि म्हणून ही उद्दिष्ट्ये उचलून धरण्यासाठी या सभेने 'आंतरराष्ट्रीय कामगार असोसिएशन' ही संघटना सुरू करण्याचा निर्णय घेतला व 'पहिली इंटरनॅशनल' अस्तित्वात आली. आधी 'मध्यवर्ती मंडळ' म्हणून व पुढे 'सर्वसाधारण मंडळ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या समितीवर मार्क्सची निवड झाली.

अशा पद्धतीने समान उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ज्याने मार्ग तयार केला, तो कार्ल मार्क्स आता आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या पहिल्या, पायाभरणीच्या सभेचा साक्षीदार होता व सहभागीदेखील होता.

अशी जन्मली कामगारवर्गाची पहिली आंतरराष्ट्रीय संघटना. `First International'.

**(क्रमश:)** **(अनुवाद : शोभा ठेकेदत्त)**

# बीड : शेतकऱ्यांना पीक विम्याचे वाटप करा, या मागणीसाठी माकपतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा




बीड जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांना विमा कंपन्यांच्या अनागोंदी कारभारामुळे अद्यापपर्यंत पीक विमा मिळाला नाही. त्यामुळे ते शेतकरी अस्वस्थ आहेत. सन २०१८ मध्ये विमा रक्कम भरलेल्या शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत या ना त्या कारणाने पीक विमा मिळाला नाही. ही रक्कम तात्काळ त्यांच्या खात्यावर जमा करा, या मागणीसाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी ९ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून धरणे आंदोलन केले.

२०१८ मध्ये पीक विमा भरलेल्या सर्व शेतकऱ्यांची पीक विमा संरक्षित रक्कम त्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी, ओव्हर इन्शुरन्स यादीत समाविष्ट महसूल मंडळातील शेतकऱ्यांना सोयाबीन पिकाचा २०१८चा विमा द्या. २०१८ खरीप हंगामात पावती मिळूनही अनपेड यादीत असलेल्या शेतकऱ्यांचे प्रीमियम पुन्हा जमा करून घेण्यासाठी पोर्टल खुले करून विमा हप्ता जमा करून घेण्याचे विमा कंपनीला आदेश द्या, खाते नंबर चुकलेल्या शेतकऱ्यांचे आधारबेस पेमेंट करा, ऑनलाईन प्रस्ताव दाखल करताना शिवार गट नंबर, खाते नंबर चुकलेल्या शेतकऱ्यांचा सातबारा व इतर अपलोड दस्तऐवजप्रमाणे दुरुस्त्या करून विमा रक्कम द्या, तसेच संपूर्ण कर्जमाफी करून शेतकऱ्यांना नवीन कर्जाचे वाटप करा, या मागण्यांसाठी मोर्चा काढून धरणे आंदोलन करण्यात आले.

यावेळी माकपचे दत्ता डाके, मोहन जाधव, बाबा सर, ॲड. याकूब, संदीपान तेलगड, सुहास झोडगे, सुभाष डाके, जनक तेलगड, पंडित तुपे, दत्ता प्रभाळे, दत्ता सौंदरमल, कुलदीप करपे आदींसह शेतकरी सहभागी होते.

**- मोहन जाधव**

---

**('मराठवाडा वॉटर ग्रीड'... पान १५ वरून)**

अध्यक्षीय समारोप करताना विजयअण्णा बोराडे म्हणाले की, वॉटर ग्रीड या महाकाय प्रकल्पासंदर्भात जिल्हा, तालुका व महाविद्यालय पातळीवर चर्चा झाली पाहिजे. मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष शिल्लक आहे. सिंचन प्रश्नी शेतकऱ्यांनी जागृत व संघटित झाले पाहिजे. या प्रकल्पाच्या माध्यमातून सरकार पाणी निर्माण करीत नाही, शेतकऱ्यांचे पाणी उद्योग व शहरांकडे पळवित आहे. एकात्मिक पाणलोट क्षेत्राचा विकास करून, मृद व जलसंधारणाच्या कामातून आपण पाणी मुरवू शकतो, पाणी निर्माण करू शकतो, पाण्याचे बाष्पीभवन रोखू शकतो आणि हाच मराठवाड्याच्या दुष्काळावर व पाणी प्रश्नावर पर्याय आहे.वॉटर ग्रीड हा पर्याय होऊ शकत नाही. असे त्यांनी निर्धाराने सांगितले. जागतिक पातळीवर पाण्याचे खासगीकरण मान्य झाले नाही. मात्र या योजनेमध्ये खासगी गुंतवणुकीदार येणार आहेत. तेव्हा पाण्याचा व्यापार होईल व शेतकऱ्यांना हे परवडणारे नाही असे सांगून, शेतकऱ्यांनी व तरुणांनी या योजनेचा गांभीर्याने अभ्यास करावा, असे आवाहन त्यांनी केले.


यावेळी वॉटर ग्रीडवरील अभ्यासपूर्ण लेख असलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. आभार प्रदर्शन ॲड. कैलास रत्नपारखे यांनी केले. परिषदेला मराठवाड्यातून मोठ्या संख्येने प्रतिनिधी उपस्थित होते. ही परिषद यशस्वी करण्यासाठी संयोजन समितीतील प्रा. नारायण बोराडे, शिवकुमार सोळंके, प्राचार्या सुनंदा तिडके, डॉ. राजकुमार मस्के, भगवान काळे, डॉ. रमेश अग्रवाल, ॲड. विनायक चिटणीस, मारोती खंदारे, अनिल मिसाळ, देविदास जिगे, दत्ता कदम, सुधीर शिंदे यांनी परिश्रम घेतले.

**- अण्णा सावंत**

---

# कॉ. हनुमंत शिंदे यांना अखेरचा लाल सलाम!

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व सीटूचे पुणे येथील ज्येष्ठ नेते कॉ. हनुमंत शिंदे यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी अल्प आजारामुळे १३ ऑगस्ट रोजी भोसरी येथील रुग्णालयात निधन झाले.



कॉ. शिंदे हे १९७७ पासून पक्ष व सीटूत सक्रिय होते. पक्षाचे दिवंगत नेते कॉ. प्रभाकर मानकर यांच्यासोबत कार्य करत असताना, त्यांनी त्यांच्यावर सोपवलेल्या कार्यालयीन व्यवस्थापनाची जबाबदारी त्यांनी अथकपणे ४० वर्षांपेक्षा अधिक काळ सांभाळली. एकही दिवस विश्रांती न घेता कॉ. शिंदे कार्यालयात हजर राहून व्यवस्थापन बघत असत. सीटूच्या कार्यकर्त्यांसोबत विद्यार्थी-युवक आघाडीच्या मदतीला कायम ते अग्रभागी असत. त्या कार्यकर्त्यांशी त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते.

कॉ. शिंदे यांच्या पश्चात सून, दोन कन्या, जावई व नातवंडे असा परिवार आहे. विश्रांतवाडी येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. माकपचे पुणे जिल्हा सचिव ॲड. नाथा शिंगाडे, सीटूचे जिल्हा सचिव वसंत पवार यांनी त्यांना आदरांजली वाहिली. माकपचे व जनसंघटनांचे जिल्हा समितीचे सदस्य तसेच पक्ष व जनसंघटनांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

**कॉ. हनुमंत शिंदे यांना अखेरचा लाल सलाम!**

# दक्षिण महाराष्ट्रातील पूरग्रस्तांना सढळ हाताने मदत करा!
# मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जनतेला आवाहन

ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात संपूर्ण कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्याच्या काही भागांत अतिवृष्टीने अतोनात हानी झाली आहे. सांगली जिल्ह्यात कृष्णा नदीत पुरातून सुटका करणारी बोट बुडाल्याने १६ जणांचा दुर्दैवी अंत झाला. सांगली जिल्ह्यातील अनेक आणि कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वच्या सर्व तालुक्यांना महापुराचा जबरदस्त फटका बसला आहे. जिल्ह्यातील सर्व धरणे ओसंडून वहात असून सर्वच्या सर्व नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडून त्यांच्या पुराचे पाणी गावागावांत घुसले आहे.

हा या भागाच्या ज्ञात इतिहासातील सर्वात भयानक महापूर असून गेल्या ७ दिवसांत ५०० मिमी आणि ५ व ६ ऑगस्ट या दोन दिवसांत १३० मिमी पाऊस झाला. सर्व धरणांच्या क्षेत्रात मोठा पाऊस झाल्याने त्यातील पाणी एकाच वेळी सुटल्याने गंभीर पूर परिस्थिती निर्माण झाली. अर्धे कोल्हापूर शहर, ७० टक्के सांगली शहर तसेच कराड शहराचा काही भाग पाण्याखाली गेला असून तिन्ही जिल्ह्यांतील ५००हून अधिक गावांचे अतोनात नुकसान झाले आहे.

६० हजार हेक्टरहून अधिक शेती पाण्यात गेली असून त्यातील खरीपाची पिके आणि भाजीपाला नष्ट झाला आहे. शेतकऱ्यांनी पाळीव जनावरे वाचावीत म्हणून सोडून दिल्याने त्यांच्यावर नवे संकट ओढवणार आहे. कोल्हापूर जिल्ह्यातच ३० हजारहून अधिक लोकांना तात्पुरता आसरा शोधावा लागला असून तिन्ही जिल्ह्यातील सुमारे पाच लाख लोकांचे जीवन या महापुराने उद्ध्वस्त झाले आहे. कोल्हापुरासहित कित्येक गावे आणि शहरांचा इतर भागांशी संपर्क तुटला आहे. कराडची पाटणकर कॉलनी झोपडपट्टी आणि वाईच्या कातकरी वस्तीतील शेकडो घरे उद्ध्वस्त झाली आहेत.

या सर्व परिस्थितीत जनतेने स्वयंस्फूर्तपणे अभिनंदनीय अशी मदत पूरग्रस्तांना केली आहे. त्यांच्या निवाऱ्यापासून ते खाण्यापिण्याची सोय जनतेच्या पुढाकाराने झाली आहे. प्रशासन मात्र बहुतेक ठिकाणी ठप्प असल्याच्या रास्त तक्रारी हजारो पूरपीडितांनी केल्या आहेत.

या पूरग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न गंभीर रूप धारण करणार आहे. पूर ओसरल्यानंतर घराकडे जाणाऱ्या जनतेला पडकी घरे, वाहून गेलेले धान्य आणि इतर वस्तू, तसेच पुरानंतर पसरू शकणारी रोगराई या परिस्थितीला सामोरे जावे लागणार आहे. त्यांना तातडीने खाण्यापिण्याची, वैद्यकीय सेवेची आणि औषधपाण्याची व्यवस्था करावी लागणार आहे. पडझडीचा अंदाज घेऊन इमारतींची दुरुस्ती करावी लागणार आहे. या भागात अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यांच्यासोबतच शेतमजुरांनाही दैनंदिन उदरनिर्वाहाच्या समस्या भेडसावणार आहेत. कामगारांच्या घरांसोबतच त्यांचा रोजगार बुडाला आहे. शालेय मुलामुलींना शालेय साहित्याची त्वरीत गरज भासणार आहे.

अशा परिस्थितीत या पूरग्रस्तांची धान्य, घरातील वस्तू, कपडे, शालेय साहित्य, औषधे आदींची गरज भागवण्यासाठी जनतेने पुढे यावे; दैनंदिन खाद्यपदार्थांसाठी कोरड्या धान्याची बंद पाकिटे आणि संसारोपयोगी साहित्य घेण्यासाठी, तातडीचा खर्च भागवण्यासाठी अधिकाधिक निधी द्यावा असे आवाहन जनतेला मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष करत आहे. पक्षाच्या आणि जनसंघटनांच्या सर्व कार्यकर्त्यांनी या कामी त्वरित पुढाकार घ्यावा.

वस्तूरूपाने जे साहित्य जमा होईल ते 'जनशक्ती', वरळी, मुंबई या पक्षाच्या राज्य कमिटीच्या कार्यालयात पाठवावे. तेथून पूरपीडित जनतेत त्याच्या वितरणाची व्यवस्था केली जाईल.

पूरग्रस्त निधीची रक्कम पक्षाच्या राज्य कमिटीच्या पुढील बँक खात्यात जमा करावी आणि त्याची माहिती राज्य कोषाध्यक्ष महेंद्र सिंह यांच्या ९८६९३०३६६६ या व्हॉट्सॲप नंबरावर अवश्य कळवावी.

COMMUNIST PARTY OF INDIA (MARXIST)
MAHARASHTRA STATE COMMITTEE
PUNJAB NATIONAL BANK
WORLI NAKA BRANCH
ACCOUNT NUMBER - 0564000113271383
IFSC CODE - PUNB0056400,
MICR CODE - 400024033

**नरसय्या आडम**
सचिव, महाराष्ट्र राज्य कमिटी
मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष

**पूरग्रस्तांसाठी रोखीने येणाऱ्या रकमा, त्या देणाऱ्या व्यक्ती आणि संघटनांच्या नावांसह 'जीवनमार्ग'मध्ये जाहीर केल्या जातील.**



# ‘मराठवाडा वॉटर ग्रीड’चा पुनर्विचार करा! जालन्यातील विभागीय परिषदेत ठराव






मराठवाडा वॉटर ग्रीडबाबत राज्य शासनाने पुनर्विचार करावा, अशा मागणीचा ठराव जालना येथे ११ ऑगस्ट रोजी आयोजित केलेल्या विभागीय परिषदेमध्ये एकमताने मंजूर करण्यात आला. परिषदेच्या अध्यक्षस्थानी कृषी व पाणी विषयाचे अभ्यासक विजयअण्णा बोराडे होते. परिषदेचे उद्घाटन प्रसिद्ध जलतज्ज्ञ प्रा. प्रदीप पुरंदरे यांच्या भाषणाने झाले. ‘मराठवाडा वॉटर ग्रीड’ या विषयावरील बीज भाषण महाराष्ट्र सिंचन सहयोगचे उपाध्यक्ष प्रा. बापू अडकिणे यांनी केले. सुरुवातीला परिषदेची भूमिका व प्रास्ताविक परिषदेचे आयोजक सीटूचे नेते अण्णा सावंत यांनी केले.

मराठवाडा वॉटर ग्रीडवर २५ हजार कोटी खर्च करण्याऐवजी तो पैसा मराठवाड्यातील अनुशेष दूर करणे, मृद व जलसंधारणाची कामे करणे, बांधकामाधीन अपूर्ण प्रकल्प पूर्ण करणे, पूर्ण झालेल्या प्रकल्पांची देखभाल दुरुस्ती करणे तसेच महाराष्ट्र जीवन प्राधीकरणाच्या पाणी पुरवठा योजना, ज्या अनेक बंद व नादुरुस्त आहेत, त्या दुरुस्त करण्यासाठी केला तर मराठवाड्यातील दुष्काळावर कायमस्वरूपी उपाय होईल, असे प्रतिपादन उद्घाटनपर भाषणामध्ये प्रा. पुरंदरे यांनी केले.

प्रा. बापू अडकिणे यांनी आपल्या बीज भाषणात शासनाने प्रस्तावित केलेली या योजनेची आवश्यकता, व्यवहार्यता आणि अंमलबजावणी याबाबत शंका व्यक्त केली. ते पुढे म्हणाले, मराठवाड्यावर पाणी वाटपाबाबत होणारा अन्याय प्रथम दूर केला पाहिजे. मराठवाड्यातील धरणांमध्ये पाणीच नाही, सर्व धरणे अवर्षणप्रवण भागातील असल्यामुळे पाऊस कमी पडतो. एखाद्यावेळी अपघाताने पाऊस जास्त होऊन धरणे भरली तरी लाभ क्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही. हा अनेक वर्षांचा अनुभव आहे. शेवटी त्या धरणातील पाण्यावर त्या लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांचा अधिकार असताना वॉटर ग्रीड शेतकऱ्यांचे पाणी उद्योग व शहराकडे वळविणार असेल तर त्यातून खासगीकरणाचा धोका आहे. त्यातून नवीन संघर्षाला तोंड फुटल्याशिवाय राहणार नाही. असा इशारा त्यांनी दिला.

बीज भाषणावरील चर्चेत आपले विचार व्यक्त करताना परिषदेत सामील झालेले वाल्मीचे माजी सहसंचालक डॉ.एस.बी. वराडे, मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे शंकरराव नागरे, राजन क्षीरसागर, पाणी प्रश्नांचे अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी वॉटर ग्रीड प्रकल्पाचे विश्लेषण करून श्रोत्यांना महत्त्वाची माहिती दिली. वक्त्यांनी सांगितले की, वॉटर ग्रीड खरोखर राबवायची सरकारची इच्छाच असेल तर प्रथम पश्चिमी वाहिन्यांचे वाहून जाणारे अनिश्चित पाणी व कृष्णा खोऱ्यातील मराठवाड्याच्या हक्काचे २५ टीएमसी पाणी प्रथम मराठवाड्यात आणावे. लुप तंत्रज्ञान म्हणजे नेमके काय? पाणी असलेल्या धरणातून पाणी नसलेल्या धरणात पाणी सोडण्याचा निर्णय कोण घेणार? पाईपलाईन फोडली तर त्यावर नियंत्रण कोणाचे असणार? या प्रकल्पाच्या वीजेचे बील कोण भरणार? या व अशा अनेक प्रश्नांची स्पष्ट उत्तरे योजनेच्या प्रस्तावामध्ये मिळत नाहीत. या प्रकरणात महाराष्ट्र जलसंपत्ती प्राधिकरणाची भूमिका काय असणार? अशा अनेक त्रुटींचा पाढा वक्त्यांनी वाचला.

परिषदेला आलेले तज्ज्ञ व संयोजन समितीने परिषदेच्या ठरावाचा एक प्रस्ताव तयार केला होता. तो ठराव किसान सभेचे गोविंद आर्दड यांनी परिषदेसमोर मांडला. अनुमोदन ॲड. किशोर राऊत यांनी दिले. या ठरावावर सांगोपांग चर्चा झाली. या चर्चेमध्ये मराठवाड्यातून आलेल्या प्रतिनिधींनी आपले विचार व्यक्त केले. काही प्रतिनिधींनी ठरावाच्या शब्दरचनेवर व त्रुटींवर सूचना केल्या तर काही प्रतिनिधींनी ठरावाचे जोरदार समर्थन करताना म्हटले की, निवडणुका तोंडावर आल्यामुळे जनतेची दिशाभूल करण्याचा हा प्रकार आहे. यामध्ये ठेकेदार, पुढारी व अधिकाऱ्यांची चांदी होणार आहे. जलयुक्त शिवार यशस्वी झाल्याचा दावा सरकार करीत आहे तर वॉटर ग्रीडची आवश्यकता काय? असा प्रश्न विचारून जलयुक्त शिवारमधील अनेक गैरप्रकार समोर आल्याचे सांगून, सरकारच्या हेतूवर शंका घेण्यात आली.

ठरावातील चर्चेत भाई बळीराम चेडे, उस्मानाबाद, द्वारकादास पार्थीकर, औरंगाबाद, शिवाजी कौठेकर, बीड, राजा कदम, हिंगोली, रामचंद्र उन्हाळे, नांदेड, शंकरराव नागरे, जालन्याचे प्रा.बी.वाय. कुलकर्णी, राम गायकवाड, सदाशिव भुतेकर, शिवाजी लकडे इत्यादी प्रतिनिधींनी भाग घेतला. शेवटी सर्व सूचना स्वीकारून ठराव परिषदेत एकमताने मंजूर झाला.

(पान १३ पहा)

R.N.I.No. 11321/1999
Posting under the New Registration N0. MCW/168/2018-2020
Posted at Mumbai Patrika Channel, Stg, Mumbai-1. On every Monday & Tuesday
Published on Sunday, August 18, 2019.



# २ ऑगस्ट : भाजप सरकारच्या कामगारविरोधी धोरणांचा सीटूसह अनेक कामगार संघटनांनी केला तीव्र निषेध!



मुंबई



नाशिक, जि. नाशिक



पुणे, जि. पुणे



औरंगाबाद, जि. औरंगाबाद



जळगाव, जि. जळगाव


शहादा, जि. नंदुरबार

हे साप्ताहिक मुद्रक-प्रकाशक डॉ. अशोक मित्रचंद्र ढवळे यांनी भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)च्या महाराष्ट्र राज्य समितीसाठी अंजूम बाईंडिंग वर्क्स, मेझेंट रोड, एमबीपीटी प्लॉट नं. १८/सी, शिवडी (पूर्व), मुंबई - ४०० ०१५. येथे छापून 'जनशक्ती', पी. बी. मार्ग, वरळी, मुंबई, महाराष्ट्र - ४०००१३ येथे प्रकाशित केले. संपादक : डॉ. उदय मनोहर नारकर